नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५२ * अंक १९३ * * अकोला * | गुरुवार, दिनांक १५ जानेवारी २०२६ | ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## छत्तीसगडमध्ये २९ नक्षल्यांचे आत्मसमर्पण

■ वृत्तसंस्था, सुकमा, दि. १४ :
छत्तीसगडच्या सुकमा जिल्ह्यात बुधवारी २९ नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केले. आत्मसमर्पण केलेल्या नक्षलवाद्यांपैकी एकावर २ लाख रुपये बक्षिस होते. सुकमा जिल्ह्यातील गोगुंडा परिसरातील केरळपाल क्षेत्र समितीमध्ये सक्रिय असलेल्या २९ नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केले आहे.

आत्मसमर्पण केलेल्या नक्षलवाद्यांमध्ये गोगुंडा पंचायतीतील दंडकारण्य आदिवासी किसान मजदूर संघटनचे अध्यक्ष पोडियम बुधराचा समावेश आहे. नक्षलविरोधी कारवाया, सततचा दबाव आणि परिसरातील मोहिमांमुळे नक्षलवादी संघटनेच्या कारवाया मर्यादित झाल्या आहेत. यामुळे नक्षलवादी मोठ्या संख्येने आत्मसमर्पण करत आहेत.

## लोकहो, मतदान करा !




आज महाराष्ट्राच्या महानगरांमध्ये मतदान करण्याचा दिवस आहे. देश स्वतंत्र झाला तेव्हा शिकलेले-सवरलेले लोक फारच कमी होते. खेड्या-पाड्यांमध्ये तर सातवी पास केली की चक्क शिक्षक होता येत होते. त्या वेळचे चित्र सध्या कितीतरी बदललेले आहे जे तुम्हाला दररोज दिसून येते. महानगरांची गोष्ट सोडाच लहान सहान खेड्यातही हल्ली दोन चार डिग?्या हातामध्ये असणारे लोक दिसत आहेत आणि ते बिचारे वणवण भटकत आहेत. जुन्या काळात शिक्षित असणाऱ्यांची संख्या अत्यंत कमी होती किंवा जे अक्षरशः अक्षरशत्रू होते. त्यांनी अमुक एका चिन्हावरती शिक्का मारायचे ठरवल्यावरती तो त्याच्यावरती शिक्का मारला जात होता. तेव्हा जनसंघाचा दिवा घरोघरी लावा, काँग्रेसच्या बैलजोडीवर शिक्का मारा आणि गाय वासरू नका विसरु, साम्यवादी पक्षाच्या वेळा भोपळ्यावर शिक्का मारून विजयी करा अशा घोषणा असत. त्याच्या आधी पाच-दहा वर्ष अधिक मतदान करताना एका खोलीत मत टाकावे लागत असे. त्यामध्ये वेगवेगळ्या पक्ष्यांच्या किंवा अपक्षांच्या निवडणूक चिन्हासह पेट्या ठेवलेल्या असत, त्यामध्ये मध्ये टाकली जात होती. तेव्हा अगदी उत्साहात येऊन भरभरून मते टाकण्यात येत होती. परंतु तेव्हाही मोठमोठ्या महानगरांमधले मतदार असलेल्या शिकल्या सवरलेल्या लोकांना मतदान ऐवजी इकडे तिकडे फिरून मतदानाची सुट्टी एन्जॉय करता आली याचा आनंद होत होता. आताही या विचारसरणीत फारसा बदल झालेला नाही मात्र सरकारच्या नावाने बोंबा मारायच्या. पण मते देताना पलायन करायचे असे असल्यामुळे तथाकथित सुबुद्ध समजले जाणारे हे लोक आपल्या निवडणूक प्रक्रियेचे फक्त वर्णन करण्यातच धन्यता मानायचे. प्रत्यक्षात मतदान करण्यासाठी गेले पाहिजे असे या मोठमोठ्यांना आणि भल्या भल्यांना वाटत नसे. मतदान करणे म्हणजे रिकामटेकड्या लोकांचे काम आहे असे तेव्हा सुद्धा शहरी शहाण्यांना वाटत होते. आज मनपासाठी मतदान करायचे आहे ते महाराष्ट्राच्या महानगरात राहणाऱ्या विद्वांनानाही करायचे आहे, श्रीमंतांनाही करायचे आहे, मध्यमवर्गीयालाही करायचे आहे आणि बिचाऱ्या गरिबांना तर करायचेच आहे. कारण मतदानाचा एकच दिवस किंवा मतदान पार पडेपर्यंत जरी मतदार मूर्ख असला तरी त्याला शहाण्याचा मान मिळत असतो. एकूणच मोठमोठ्या शहरांची टक्केवारी बघितली तर हे प्रमाण साधारणपणे ५०% पेक्षा थोडेसे जास्त असते. ते १००% का होत नाही याचा उलगडा अजूनही आम्हाला झालेला नाही. मतदान न करणाऱ्यांना शिक्षा दिलीच पाहिजे. योग्य कारणाशिवाय मतदान केले नाही तर तुम्हाला कैद होऊ शकते असा कायदा करणे आजपर्यंत कुठल्याही सरकारला का वाटले नाही? नियमाला अपवाद ठीक आहे पण मतदानाच्या बाबतीत अपवाद हाच नियम ठरतो. आपल्याला लोकशाही अधिक योग्य प्रकारे राबवायची असेल तर मतदान न करणाऱ्यांना निश्चितपणे मोठा दंड बसवला पाहिजे. विशेष म्हणजे कोणालाही याबाबत विरोध करण्याचा हक्क दिलाच नाही पाहिजे. ज्याप्रमाणे निवडणूक आयुक्तांनी वाट्टेल ते केले तरी त्यांच्यावर गुन्हा दाखल करता येत नाही, अगदी त्याचप्रमाणे जो मत देणार नाही त्याने निवडणूक आयुक्तांचा अपमान केला असा आरोप ठेवून त्याला शिक्षा दिलीच गेली पाहिजे. अशा प्रकारच्या शिक्षेसाठी शहरी मतदारांची संख्या किंवा टक्केवारी जास्त असेल. म्हणूनच महानगरपालिकेच्या महामतदानात हा असा महाकायदा करावा, अशी आमची नम्र सूचना आहे. आम्ही मथळ्यात मतदान करण्याचे आवाहन केले आहे. ते गंभीरपणे घेणाऱ्यांना आमचा नमस्कार, लोकहो, मतदान करा!

mahasagarngp@gmail.com
Mob. No. 9922970023

# २९ महापालिकांसाठी आज मतदान

## सुमारे १६ हजार उमेदवारांचे भाग्य आज ईव्हीएममध्ये बंद होणार : प्रशासन पूर्णतः सज्ज

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर / मुंबई, दि. १४ :
गुरूवार १५ जानेवारीला राज्यातील २९ महानगर पालिकांसाठी मतदान होत आहे. या निकालातून राज्यातील साल २०२९ चे राजकीय चित्र स्पष्ट होणार आहे. महाराष्ट्रात २९ महानगर पालिकेच्या निवडणूका राज्यातील भविष्यातील राजकारणाची नांदी ठरणार आहेत.

एकीकडे सत्ताधारी महायुती (भाजपा-शिंदेसेना-राष्ट्रवादी अजित पवार गट) मैदानात आहेत. तर दुसरीकडे महाविकास बहुजन आघाडी (काँग्रेस-उबाठा-राष्ट्रवादी शरद पवार गट) असा विरोधी सामना असला तरी मुंबई, ठाणे वगळता पुणे, पिंपरी चिंचवड, नाशिक, नांदेड, अमरावती, मालेगाव, अकोला, मीरा-भाईंदर, नवी मुंबई, धुळे, उल्हासनगर, सांगली, छत्रपती संभाजीनगर, जालना या १४ महानगरपालिकांच्या निवडणुकीत सत्ताधारी भाजपा आणि शिवसेना एकनाथ शिंदे गट आणि अजित पवार राष्ट्रवादी स्वंतत्र लढा देत आहेत. याशिवाय मनसे, एमआयएम, वंचित बहुजन आघाडी आणि अनेक स्थानिक आघाड्या आहेत. मुंबईत काँग्रेस आणि वंचित एकत्र लढत आहेत.

महापालिकांच्या या महाकुंभात एकूण ३ कोटी ४८ लाख ७८ हजार १७ मतदार आपले मतदानाचे पवित्र कार्य बजावू शकतील. भाजपा- दोन्ही शिवसेनांसह, मनसे, काँग्रेस, दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस या सर्वच प्रमुख पक्षांसाठी या निवडणूका अतिशय महत्वाच्या आहेत.

मुंबईत तर भाजपा- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस-उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या विरोधात ब्रँड ठाकरे असा जंगी सामना रंगणार आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुणे-पिंपरी-चिंचवडमध्ये



आपली शक्ती केंद्रित केली आहे. मुंबई महापालिकेच्या निकालाकडे आता संपूर्ण देशाचे लक्ष लागले आहे.

राज्यातील २९ महापालिकांसाठीच्या एकूण ८९३ प्रभागांसाठी एकूण १५ हजार ९३१ उमेदवार अंतिमतः रिंगणात उरले आहेत. विशेष म्हणजे ८८४० उमेदवारांनी आपली उमेदवारी मागे घेतली होती. या माघारीवरून आणि बिनविरोध वरून देखील बरेच रणकंदन माजले.

मुंबई वगळता अन्य सर्व २८ महानगरपालिकांच्या निवडणुका बहुसदस्यीय पद्धतीने होत आहेत. मुंबई महानगरपालिकेत एका प्रभागातून एकच सदस्य निवडून द्यावयाचा असल्याने प्रत्येक मतदाराला केवळ एकच मत द्यावे लागेल. उर्वरित सर्व २८ महानगरपालिकांमध्ये बहुसदस्यीय प्रभाग पद्धतीमुळे प्रत्येक प्रभागात साधारणतः चार किंवा तीन जागा असतील. त्यानुसार मुंबई वगळता अन्य सर्व महानगरपालिका निवडणुकांमध्ये प्रत्येक मतदाराने किमान ३ ते ५ मते देणे अपेक्षित असेल.

दरम्यान, गुरूवारी होणाऱ्या मतदान प्रक्रियेसाठी अधिकारी, कर्मचारी केंद्रावर पोहचले असून, प्रशासन सज्ज झाले आहे.

## ईव्हीएम बंद पडल्यावर पाडू वापरणार

### राज ठाकरेंचा आक्षेप : आयोगाच्या भूमिकेवर संशय

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १४ :
मुंबई महानगर पालिकेच्या निवडणुकीच्या तोंडावर निवडणूक प्रक्रियेत नव्या यंत्राच्या समावेशामुळे राजकीय वातावरण तापले आहे.



निवडणूक आयोगाने पाडू नावाचं नवीन मशीन आणल्याची माहिती समोर आल्यानंतर मनसेप्रमुख राज ठाकरे यांनी यावर थेट सवाल उपस्थित केला आहे. प्रिंटींग ऑक्झिलरी डिस्प्ले युनिट, म्हणजेच पाडू मशीन उद्यापासून सर्वत्र ठेवण्यात येणार असल्याचं सांगण्यात येत असताना, याबाबत आधी कोणतीही अधिकृत माहिती का देण्यात आली नाही, असा प्रश्न राज ठाकरे यांनी केला आहे.

ईव्हीएम यंत्रणेशी संबंधित कोणताही बदल पारदर्शकपणे जाहीर व्हायला हवा होता, मात्र तसं न झाल्याने संशय निर्माण होत असल्याचे ते म्हणाले. राज ठाकरे यांच्या आक्षेपानंतर प्रशासनाकडून स्पष्टीकरण देण्यात आलं आहे.

मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी यांनी पाडू मशीनच्या वापराबाबत स्पष्ट भूमिका मांडली. पाडू मशीन मुंबईत कुठेही सरसकट वापरलं जाणार नसून, केवळ अपवादात्मक किंवा आपत्कालीन परिस्थितीतच त्याचा वापर करण्यात येईल, असं त्यांनी स्पष्ट केलं.

ईव्हीएम मशीन बंद पडल्यास किंवा तांत्रिक अडचण निर्माण झाल्यास बॅकअप म्हणून हे मशीन वापरलं जाणार असल्याचंही त्यांनी सांगितलं. त्यामुळे निवडणूक प्रक्रियेत कोणताही बदल किंवा हस्तक्षेप होत नसल्याचा दावा प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

तरीही, पाडू मशीन अचानक समोर आल्यामुळे निवडणूक प्रक्रियेच्या पारदर्शकतेबाबत प्रश्न उपस्थित केले जात असल्याचे दिसून येत आहे.

## उपराजधानीत बड्या नेत्यांची प्रतिष्ठा पणाला

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १४ :
नागपूर मनपा निवडणुकीसाठी भाजपा, काँग्रेससह युती आणि आघाडीतील पक्षांनी कंबर कसली आहे. गेली अनेक वर्षे नागपूर मनपाची सत्ता हाती ठेवणाऱ्या भाजपाच्या ज्येष्ठ नेत्यांसह अन्य पक्षांच्या नेत्यांची प्रतिष्ठा या निवडणूक निमित्ताने पणाला लागली आहे.

२०१७ मधील निवडणुकीत १०८ जागा जिंकणाऱ्या भाजपसमोर यावेळी बंडखोराचे आव्हान आहे. भाजपने ३२ बंडखोरांवर निलंबनाची कारवाई केली असून त्यांचा उपद्रव पक्षाच्या १२० जागांच्या निर्धाराला सुरुंग लावण्याची शक्यता आहे. त्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीयमंत्री नितीन गडकरी तसेच पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची प्रतिष्ठा पणाला लागली आहे.

भाजपमध्ये उमेदवारी देताना अंतर्गत कलह दिसून आला. माजी महापौर अर्चना डेहनकर यांचे पती विनायक डेहनकर, धीरज चव्हाण, माजी उपमहापौर सुनील अग्रवाल यांनी भाजपाच्या अधिकृत उमेदवारांसमोर आव्हान उभे केले आहे. भाजपमधील अनेक नाराजही यावेळी प्रचारासाठी बाहेर निघाले नाहीत.

नागपूर मनपासाठी शिंदेसेनेचे मोजके उमेदवार रिंगणात असून, पक्षाचे नेते तथा राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल यांच्या नेतृत्वात त्यांनी खम ठोकली आहे. पक्षाच्या उमेदवारांना निवडून आणण्याचे मोठे आव्हान राज्यमंत्री जयस्वाल यांच्यासमोर आहे.

काँग्रेसचे विद्यमान आमदार विकास ठाकरे, डॉ. नितीन राऊत, विजय वडेट्टीवार यांच्या खांद्यावर काँग्रेसच्या विजयाची धुरा असून, मिशन १०० नगरसेवक.. असा दावा आमदार ठाकरे यांनी केला आहे. तथापि, काँग्रेसमध्येहीर बंडखोरी असल्याने काँग्रेसी नेत्यांची प्रतिष्ठा पणाला लागल्याचे दिसून येते. दुसरीकडे, शद पवार आणि अजित पवार यांचे राष्ट्रवादीचे गट स्वतःचे अस्तित्व टिकवण्यासाठी रिंगणात असल्याचे दिसून येते.

## शेतकऱ्याला बुटाने मारहाण

### कृषी अधिकाऱ्याच्या कृत्यावर काँग्रेसचा तीव्र संताप

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १४ :
संत्रा फळबागेच्या रखडलेल्या अनुदानाचा जाब विचारण्याचा प्रयत्न करणाऱ्या शेतकऱ्याला कृषी अधिकाऱ्याने चक्क बुटाने मारहाण केल्याची संतापजनक घटना वाशिम जिल्ह्यात घडली आहे. या घटनेचा एक व्हिडिओ सोशल मीडियात व्हायरल झाला आहे. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ व आमदार नाना पटोले यांनी या घटनेवर तीव्र संताप करत महायुती सरकारमध्ये काडीचीही लाज शिल्लक नसल्याचा आरोप केला आहे.

वाशिमच्या मंगरुळपीर तालुक्यातील गोगरी येथे ही घटना घडली. येथील ऋषिकेशी पवार नामक शेतकऱ्याने २ वर्षांपूर्वी मनरेगा योजनेंतर्गत ३ एकर क्षेत्रावर संत्रा फळबाग लावली होती. या फळबागेसाठी शासनाकडून मिळणारे अनुदान मागील ४ महिन्यांपासून रखडले आहे. पवार यांनी याविषयी तालुका कृषी अधिकारी सचिन कांबळे यांना जाब विचारला.

यावेळी व्हिडिओ काढण्यावरून वाद झाला आणि कांबळे यांनी पवार यांना थेट बुटाने व मातीच्या ढेकळाने मारहाण केली. कृषी अधिकाऱ्यांनी शेतकऱ्याला खोट्या गुन्ह्यात अडकवण्याची धमकीही दिली आहे.

**लाज उरली नाही : सपकाळ**

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी या घटनेवर संताप व्यक्त करत महायुती सरकारमध्ये कवडीचीही लाज उरली नसल्याचा आरोप केला आहे. ते म्हणाले, हीच स्थिती यांच्या वरपासून खालपर्यंतच्या सरकारी बाबूंची आज आहे. शेतकऱ्याला सरकारकडून मिळणारे हक्काचे अनुदान चार महिन्यांपासून रखडले. खुर्च्या उबवणारे मंत्रीमहोदय यांनी लक्षात ठेवावे शेतकऱ्यांना एवढंही गृहीत धरू नका. एक दिवस असा येईल की तुम्हाला जीव हातात घेऊन स्वतःचं रक्षण करावं लागेल, असे ते म्हणाले.

**सरकार शेतकरीविरोधी : नाना पटोले**

काँग्रेस आमदार नाना पटोले म्हणाले, देवेंद्र फडणवीस यांचे सरकार शेतकरीविरोधी आहे. कृषिमंत्री म्हणतात, भिकारी सुद्धा एक रुपयाची भीक घेत नाही, पण एक रुपयात विमा सरकार देते; अधिकारी शेतकऱ्यांच्या अंगावर धावून जात बुटाने मारहाण करतात. हा शेतकरी वर्गाच्या स्वाभिमानावर केलेला हल्ला असल्याचे पटोले म्हणाले.

## ५ वर्षानंतर विराट कोहली नंबर-१ वनडे फलंदाज

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १४ :
दिग्गज भारतीय फलंदाज विराट कोहली ५ वर्षांनंतर आयसीसी एकदिवसीय क्रमवारीत नंबर-१ फलंदाज बनला आहे. त्याने या स्थानावरून भारताच्याच रोहित शर्मार्ला मागे टाकले आहे. बुधवारी जाहीर झालेल्या क्रमवारीत रोहित आता नंबर-३ एकदिवसीय फलंदाज आहे. त्याला दोन स्थानांचे नुकसान झाले आहे.

विराटने न्यूझीलंड विरुद्धच्या पहिल्या एकदिवसीय सामन्यात ९३ धावांची खेळी केली होती, याचा त्याला थेट फायदा झाला. त्याचे आता ७८५ रेटिंग गुण झाले आहेत.

न्यूझीलंडच्या डॅरिल मिचेललाही एका स्थानाचा फायदा झाला आहे. तो आता ७८४ रेटिंगसह दुसऱ्या क्रमांकावर आहे.

विराट एप्रिल २०२१ नंतर पहिल्यांदाच आणि एकूणच त्याच्या कारकिर्दीत ११ व्यांदा नंबर-१ एकदिवसीय फलंदाज बनला आहे. गेल्या आठवड्यात तो नंबर-२ वर होता.



म्हणजेच, पहिल्या आणि दुसऱ्या क्रमांकाच्या फलंदाजांमध्ये फक्त एका रेटिंग गुणाचा फरक आहे.

## परप्रांतीयांना मारणे हा मराठी माणसांचा विकास नाही

### ठाकरे बंधूंना मुख्यमंत्र्यांचा टोला

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १४ :
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी मुंबईत महायुतीचा विजय निश्चित असल्याचा पुनरुच्चार केला. महापालिका निवडणुकीच्या निकालानंतर महाराष्ट्र हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याच मागे उभा असल्याचे अधोरेखित होईल. विशेषतः भाजप सर्वात मोठा पक्ष ठरेल, महायुतीच येथे राज्य करेल, असे ते म्हणाले. यावेळी त्यांनी परप्रांतीयाना मारहाण करणे म्हणजे मराठी माणसांचा विकास नसल्याचा टोलाही ठाकरे बंधूंना हाणला.

वृत्तसंस्थेशी संवाद साधताना फडणवीस यांनी ठाकरे बंधूंवर सडकून टीका केली. ते म्हणाले, विरोधकांनी (ठाकरे बंधू) मराठी विरुद्ध अमराठी अशी निवडणूक करण्याचा खूप प्रयत्न केला. पण मराठी माणूस एवढा संकुचित नाही. महाराष्ट्रात आमची प्रादेशिक अस्मिता आहे. मराठी आमची भाषा आहे. त्या भाषेचा आम्हाला अभिमान आहे. त्या भाषेचा विकास व कल्याण झाले पाहिजे. मराठी माणूस हा महाराष्ट्रात सुरक्षित असला पाहिजे. त्याचा विकास झाला पाहिजे. यावर दुमत असता कामा नये.

## कदमांनी सोडली पवारांची साथ

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १४ :
राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाला मोठा धक्का बसला आहे. माजी आमदार रमेश कदम यांनी राजीनामा दिला असून हा शरद पवारांना मोठा हादरा असल्याचे बोलले जात आहे.

शरद पवार यांचे कट्टर समर्थक व माजी आमदार रमेश कदम यांनी शरद पवारांची साथ सोडली आहे. रमेश कदम यांनी शरद पवार गटाचा राजीनामा दिला आहे. रमेश कदम यांचा चिपळूण नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीत पराभव झाला होता, रमेश कदम नाराज असल्याचे हो बोलले जात होते. पक्षात योग्य स्थान न मिळाल्याने त्यांनी राजीनामा दिला आहे.

## राज्यात ८९.६५ कोटींची वीज चोरी उघड

### १२४२ ग्राहकांवर गुन्हे दाखल

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १४ :
महावितरणच्या 'सुरक्षा व अंमलबजावणी' विभागांतर्गत कार्यरत ६३ भरारी पथकांनी राज्यभरात वीजचोरीविरोधात मोठी मोहीम राबवली. एप्रिल ते डिसेंबर २०२५ या नऊ महिन्यांच्या कालावधीत ६,६८७ वीजचोरीची प्रकरणे उघडकीस आणली आहेत. यामध्ये सुमारे ८९ कोटी ६५ लाख रुपयांची वीजचोरी व अनियमितता समोर आली असून, १,२४२ ग्राहकांवर दाखल करण्यात आले आहेत. एकूण ८९ कोटी ६५ लाख रुपयांपैकी ६१ कोटी ९२ लाख रुपयांची वसुली करण्यात आली आहे.

नागपूर विभागाने या मोहिमेदरम्यान सुमारे ३५ कोटी ९५ लाख रुपयांची वीजचोरी व अनियमितता उघडकीस आणली आहे. या प्रकरणी ३०८ ग्राहकांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. भरारी पथकांनी विदभार्तील एकूण ७,७७१ ग्राहकांच्या वीज जोडण्यांची कसून तपासणी केली. यात घरगुती, व्यावसायिक आणि औद्योगिक अशा सर्व प्रकारच्या ग्राहकांचा समावेश होता.

या तपासणी मोहिमेत २,२१४ ग्राहकांकडे थेट वीजचोरी होत असल्याचे निष्पन्न झाले. या चोरांविरुद्ध विद्युत कायदा २००३ मधील सुधारित कलम १३५ अन्वये कडक कारवाई करण्यात आली आहे. या एकाच कलमांतर्गत २५.४३ कोटी रुपयांच्या वीजचोरीची प्रकरणे उघडकीस आली आहेत.

थेट वीजचोरीव्यतिरिक्त, विजेचा अनधिकृत वापर किंवा मंजूर भारापेक्षा अधिक वापर करणाऱ्या ग्राहकांवरही महावितरणने लक्ष केंद्रित केले आहे.

विद्युत कायदा २००३ च्या कलम १२६ अन्वये एकूण ८९० प्रकरणांमध्ये १०.५२ कोटी रुपयांची अनियमितता उघड झाली आहे. वीजचोरी आणि अनियमितता अशा दोन्ही कारवाया मिळून एकूण ३५ कोटी ९५ लाख रुपयांच्या दंडाचे निर्धारण करण्यात आले होते, त्यापैकी ३१ कोटी ०३ लाख रुपयांची विक्रमी वसुली महावितरणने संबंधित ग्राहकांकडून केली आहे.

चोरीची रक्कम आणि दंडाचा भरणा करण्यास टाळाटाळ करणाऱ्या ग्राहकांच्या विरोधात महावितरणने आता पोलीस कारवाईचा बडगा उगारला आहे. नागपूर परिक्षेत्रातील विविध पोलीस ठाण्यांमध्ये एकूण ३०८ वीज ग्राहकांविरुद्ध वीजचोरीचे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या कारवाईमुळे वीजचोरी हा केवळ दंडनीय अपराध नसून, तो फौजदारी गुन्हा आहे, असा स्पष्ट संदेश महावितरणने दिला आहे.

## आईसह दोन मुलांचा अपघातात जागीच मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी
नाशिक, दि. १४ :
चांदवड शहरातील चांदवड-मनमाड राज्य महामार्गावर भीषण अपघात झाला. चांदवडच्या दिशेने सिमेंटच्या विटा भरलेला ट्रक भरधाव वेगाने येत होता. चालकाचे ट्रकवरील नियंत्रण सुटल्याने अचानक ट्रक उलटला. यामध्ये मजूर महिला तिच्या दोन लहान मुलांसह ट्रकच्या पाठीमागे सिमेंटच्या विटांवर बसलेली होती. अपघातात मजूर महिलेसह तिच्या दोन्ही मुलांचा जागीच मृत्यू झाला.

काही तास वाहतूक ठप्प झाली होती. क्रेनच्या सहाय्याने ट्रक बाजूला करून वाहतूक सुरळीत करण्यात आली. चांदवडचे पोलीस निरीक्षक कैलास वाघ, उपनिरीक्षक नरे, हवालदार स्वप्नील जाधव, सचिन राऊत, प्रदीप आजगे यांनी इतर जखमींना उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले.

## पार्टी फंडसाठी भाजप-शिवसेना युती सरकारची १०० कोटी रुपयांची मागणी

### अजित पवारांनी फोडला मोठा बॉम्ब
### फडणवीसांनी व्यक्त केली खदखद

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १४ :
गेल्या अनेक वर्षांपासून महाराष्ट्राच्या राजकारणात सिंचन घोटाळा हा कायमच चर्चेचा विषय राहिला आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर या घोटाळ्याच्या मुद्द्यावरून सातत्याने टीका होत आली आहे. मात्र आता अजित पवारांनीच या विषयावर पलटवार करत भाजपवरच आरोपांची तोफ डागली आहे.



सिंचन प्रकल्पांच्या खर्चवाढीमागे १९९९ पूर्वी सत्तेत असलेल्या भाजप-शिवसेना युती सरकारचा हात असल्याचा दावा पवारांनी केला. प्रचारसभेत बोलताना अजित पवारांनी सांगितले की, १९९९ साली राज्यात काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे सरकार सत्तेत आल्यानंतर जलसंपदा खात्याची जबाबदारी त्यांच्याकडे आली होती.

त्या काळात पुणे जिल्ह्यातील पुरंदर उपसा सिंचन योजनेची फाईल त्यांच्या टेबलावर आली. या फाईलमध्ये प्रकल्पाची अंदाजित किंमत ३१० कोटी रुपये दाखवण्यात आली होती. मात्र, ही रक्कम पाहून आपल्यालाच धक्का बसला.

त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना या प्रकल्पाच्या खर्चाबाबत विचारणा केली. तेव्हा एका वरिष्ठ अधिकाऱ्याने कबुली दिली की, या प्रकल्पाची मूळ किंमत फक्त २०० कोटी रुपये होती. मात्र, त्यावेळीच्या युती सरकारच्या काळातच प्रकल्पाच्या किमतीत मोठी वाढ करण्यात आली. भाजप-शिवसेनेच्या युती सरकारने पार्टी फंडसाठी १०० कोटी रुपयांची मागणी केली होती. काही अधिकाऱ्यांनीही स्वतःसाठी १० कोटी रुपये जोडले आणि २०० कोटींचा प्रकल्प थेट ३१० कोटींवर नेला.

अजित पवारांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, या संपूर्ण व्यवहाराची फाईल आजही आपल्याकडे आहे. ती त्या वेळी बाहेर काढली असती, तर राज्यात हाहाकार माजला असता. त्या काळात सिंचन खातं भाजपकडे होतं, याकडे लक्ष वेधत दादांनी भाजपकडे बोट दाखवलं आहे.

### दादांनी ते पाळले नाही...



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याविषयी खदखद व्यक्त केली आहे. मी कोणाच्या विरोधात बोलणार नाही, पण अजित दादांनी ते पाळले नाही, असे फडणवीस म्हणाले. अजित दादांना दिल्लीत आमच्या वरिष्ठ नेत्यांना भेटायला जायचे असेल तर ते जाऊ शकतात. त्यांना विमान सुद्धा देण्याची व्यवस्था मी करेन, तिकीट सुद्धा काढून देईल. जोपर्यंत आमच्या वरिष्ठांना भेटतात तोपर्यंत मी आनंदी असल्याचेही फडणवीस म्हणाले.

मी शब्द पाळणाऱ्यांपैकी आहे. मी आधीच सांगितले होते की आमची युती होणार नाही. मात्र आम्ही मैत्रीपूर्ण लढत करू. कोणाच्या विरोधात बोलणार नाही, पण अजित दादांनी ते पाळले नाही, असेही फडणवीस यावेळी म्हणाले.

## लोकशाहीच्या फोटोला हार घालून उमेदवार निवडून आल्याचे जाहीर करा



■ मुंबई : राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी ईव्हीएमला जोडण्यात येणाऱ्या पाडू मशीनवर संशय व्यक्त केला आहे. या प्रकरणी त्यांनी मनसे अध्यक्ष राज ठाकरे व शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या भूमिकेचे समर्थन केले आहे. ठाकरे बंधूंनी उपस्थित केलेला मुद्दा अत्यंत धक्कादायक व लोकशाहीसाठी धोकादायक आहे. भाजपने आता लोकशाहीच्या फोटोला हार घालून या निवडणुकीत आपले सर्वच उमेदवार निवडून आलेत असे जाहीर करावे, असे त्यांनी म्हटले आहे. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आज महापालिका निवडणुकीत ईव्हीएम मशीनला जोडण्यात येणाऱ्या पाडू मशीनवर संशय व्यक्त केला. राज्य निवडणूक आयोगाने कोणत्याही राजकीय पक्षाला विश्वासात न घेता ही मशीन ईव्हीएमला जोडण्याचा निर्णय घेतला. त्यांनी ही मशीन कशी दिसते हे ही कुणाला सांगितले किंवा दाखवले नाही. त्यामुळे हा सर्व प्रकार संशयास्पद आहे, असे ते म्हणालेत. रोहित पवार यांनी त्यांच्या या भूमिकेचे जोरदार समर्थन करत सध्या निवडणुका घेण्याचा केवळ फार्स सुरू असल्याचा आरोप केला आहे. रोहित पवार म्हणाले, कुणालाही काडीचीही कल्पना न देता निवडणूक आयोगाने एक नवीन मशीन आणलं असून ते एश्ट ला जोडण्यात येणार असल्याचं समजतंय.

## राज ठाकरेंची निवडणूक प्रक्रियेवरील विधाने बिनडोकपणाची



■ मुंबई : महानगरपालिका निवडणुकीच्या मतदानासाठी अवघे काही तास शिल्लक असताना भाजप आणि ठाकरे बंधूंमधील कलगीतुरा अधिकच रंगला आहे. भाजपचे नेते आशिष शेलार यांनी मनसे प्रमुख राज ठाकरे आणि शिवसेना (उबाठा) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्यावर घणाघाती प्रहार केला आहे. "राज ठाकरे यांची निवडणूक प्रक्रियेवरील विधाने बिनडोकपणाची असून, पराभवाची चाहूल लागल्यामुळेच ते नवनवीन कारणे शोधत आहेत, त्यांनी पराभवाची कारणे शोधून असले धंदे बंद करावे, असा टोला आशिष शेलार यांनी राज ठाकरेंना लगावला. मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी निवडणूक प्रचार संपल्यानंतर मतदारांना भेटण्यासाठी उमेदवारांना देण्यात आलेल्या परवानगीवर हरकत घेतली. या सरकारला काय हवे आहे? त्यावर हा निवडणूक आयोग काम करत आहे. निवडणूक आयोगाने उमेदवारांना मतदारांची जाऊन भेटण्याची मुभा दिली आहे. पण पत्रके वाटण्याची परवानगी नाकारली आहे. मग कदाचित पैसे वाटू शकता, असे आयोगाला म्हणायचे असेल. मुळात ही मुभा का मिळाली, का दिली व हा कायदा बदलला का? या नव्या गोष्टी कशासाठी आणल्या जात आहेत? असा आमचा प्रश्न आहे, असे राज ठाकरे यांनी म्हटले आहे. या आरोपांवर भाजप नेते आणि राज्याचे सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांनी निशाणा साधला आहे.

## निवडणूक आयोगाने आजचा दिवस सत्ताधाऱ्यांना तिळगुळ दिला



■ मुंबई : प्रचाराची अधिकृत मुदत संपल्यानंतरही निवडणूक आयोगाने थेट मतदानाच्या आदल्या दिवशी रात्री दहा वाजेपर्यंत घरोघरी जाऊन प्रचार करण्यास दिलेल्या मुभीमुळे राज्याच्या राजकारणात मोठा वाद निर्माण झाला आहे. उद्या (15 जानेवारी) मतदान असताना आज (14 जानेवारी) प्रचार सुरू ठेवण्याची परवानगी दिल्याने विरोधी पक्षांनी निवडणूक आयोगावर गंभीर आरोप केले आहेत. सत्ताधाऱ्यांकडून राजरोस पैसे वाटप होत असल्याचे आरोप आधीपासूनच सुरू असताना, आयोगाच्या या निर्णयामुळे संशय अधिक गडद झाला आहे. या पार्श्वभूमीवर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी निवडणूक आयोगासह सत्ताधाऱ्यांवर जोरदार हल्लाबोल केला आहे. संजय राऊत यांनी निवडणूक आयोगाने आजचा दिवस सत्ताधाऱ्यांना तिळगुळ दिल्याचा थेट आरोप केला. प्रचाराची मुदत संपल्यानंतरही नियम मोडून सत्ताधाऱ्यांना वेगळी मुभा देण्यात आली का, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. एकदा प्रचाराची मुदत संपली की प्रचार थांबतो, ही आतापर्यंतची परंपरा होती. मात्र अचानक निवडणूक आयोगाने घराघरात जाऊन प्रचार करण्याची मोकळीक दिली. यामुळे आयोगाच्या भूमिकेवर संशय निर्माण होतो, असे राऊत म्हणाले. त्यांनी या निर्णयाला लोकशाहीसाठी धोकादायक असल्याचेही नमूद केले.

# जिमखाना दिला म्हणजे मालकी नाही

## मरिन ड्राईव्हवरील विल्सन जिमखाना वादात मुख्यमंत्र्यांचा इशारा

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १४ :

दक्षिण मुंबईतील मरिन ड्राईव्ह परिसरातील विल्सन जिमखाना जैन इंटरनॅशनल ऑर्गनायझेशनला देण्याच्या निर्णयावरून निर्माण झालेल्या वादात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट आणि कठोर भूमिका मांडली आहे. ज्या ठरावीक उद्देशासाठी हा जिमखाना भाडेपट्ट्याने देण्यात आला आहे, तो उद्देश साध्य झाला नाही, तर कोणतीही तडजोड न करता हा भूखंड संबंधित संस्थेच्या ताब्यातून काढून घेण्यात येईल, असा इशारा त्यांनी दिला. महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर आयोजित एका कार्यक्रमात ते बोलत होते.

मरिन ड्राईव्ह येथील समुद्रकिनाऱ्यालगत असलेल्या पाच जिमखान्यांपैकी एक असलेला विल्सन जिमखान्याचा भूखंड अलीकडेच जैन इंटरनॅशनल ऑर्गनायझेशनला भाडेपट्ट्याने देण्यात आला आहे. या निर्णयानंतर या जिमखान्याचे नामकरण जैन जिमखाना असे करण्यात आले. मात्र हा भूखंड जैन इंटरनॅशनल ऑर्गनायझेशनला देण्यास परिसरातील स्थानिक रहिवाशांनी तीव्र विरोध दर्शवला होता. सार्वजनिक वापराच्या जागेचा उपयोग एका विशिष्ट संस्थेसाठी केला जात असल्याचा आक्षेप त्यांनी घेतला.

स्थानिक रहिवाशांचा हा विरोध असूनही प्रशासनाने निर्णय कायम ठेवत जिमखाना जैन इंटरनॅशनल ऑर्गनायझेशनच्या ताब्यात दिला. संस्थेने ताबा घेतल्यानंतर जिमखान्याच्या दर्शनी भागावर जैन जिमखाना, असा नामफलकही लावण्यात आला आहे. या घडामोडींमुळे परिसरात असंतोषाचे वातावरण निर्माण झाले असून, हा मुद्दा केवळ स्थानिक मर्यादेत न राहता राज्यपातळीवर चर्चेचा विषय ठरला आहे.




या प्रकरणासंदर्भात सरकारकडून स्पष्टीकरणाची मागणी होत असताना, मुख्यमंत्र्यांनी या निर्णयामागील पार्श्वभूमी मांडली. त्यांनी सांगितले की, विल्सन जिमखान्याचा आधीचा करार संपुष्टात आला होता आणि करार असलेल्या संस्थेकडून जिमखान्याचा वापर ठरवून दिलेल्या उद्देशानुसार होत नव्हता. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या म्हणण्यानुसार, अशा परिस्थितीत जैन इंटरनॅशनल ऑर्गनायझेशनकडून जिमखान्याबाबतचा प्रस्ताव सरकारकडे आला. या प्रस्तावाची सखोल पडताळणी केल्यानंतरच जिमखाना भाडेपट्ट्याने देण्याचा निर्णय घेण्यात आला. मात्र हा निर्णय घेताना सरकारने काही अटी स्पष्टपणे ठरवल्या असून, त्यांचे पालन होणे अत्यावश्यक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

ज्या कारणासाठी हा जिमखाना देण्यात आला आहे, त्याच कारणासाठी त्याचा वापर व्हायला हवा, असे ठाम मत मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केले. भविष्यात जर असे आढळून आले की, मूळ उद्देश डावलून किंवा वेगळ्या कारणासाठी या भूखंडाचा वापर केला जात आहे, तर सरकार कोणतीही दिरंगाई न करता कारवाई करेल, असे त्यांनी स्पष्ट केले. यामध्ये जैन इंटरनॅशनल ऑर्गनायझेशनलाही अपवाद नसेल, असे संकेत त्यांनी दिले. मुख्यमंत्र्यांच्या या भूमिकेमुळे विल्सन जिमखाना प्रकरणाला नवे वळण मिळाले आहे. एकीकडे स्थानिक रहिवाशांच्या विरोधाला काही प्रमाणात नैतिक बळ मिळाले असून, दुसरीकडे जैन जिमखान्याच्या वापराबाबत सरकारची काटेकोर नजर राहणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

## संभाजीनगरमध्ये भाजपवर पैसे वाटपाचे आरोप

### पैसे वाटणाऱ्या भाजपच्या लोकांना चोप देण्याचे उद्धवजींचा आदेश : दानवे

■ वृत्तसंस्था, छत्रपती संभाजीनगर, दि. १४ :

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका निवडणुकीच्या मतदानाला अवघे काही तास शिल्लक असताना छत्रपती संभाजीनगरमध्ये राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. शहरात विविध ठिकाणी भाजप कार्यकर्त्यांकडून पैसे वाटप होत असल्याचा खळबळजनक आरोप शिवसेना ठाकरे गटाच्या नेत्यांनी केला आहे. यावरून शिवसैनिक आणि भाजप कार्यकर्त्यांमध्ये झटापट झाल्याच्या घटना समोर आल्या असून, "पैसे वाटणाऱ्यांना चोप द्या, असा आदेश उद्धवजींनी दिल्याचे ठाकरे गटाचे नेते अंबादास दानवे यांनी सांगितले.

मिळालेल्या माहितीनुसार, मंगळवारी रात्री शहरातील नरेश भालेराव आणि अनिकेत राठोड यांच्या प्रभागात संशयास्पद हालचाली सुरू असल्याची माहिती शिवसैनिकांना मिळाली. एका ठिकाणी एका व्यक्तीला मतदारांना पैसे वाटताना शिवसैनिकांनी रंगेहाथ पकडले. विशेष म्हणजे, जप्त करण्यात आलेल्या पाकिटांवर कोणत्या मतदाराला किती पैसे द्यायचे, याची नावेही लिहिलेली असल्याचा दावा करण्यात आला आहे. या घटनेमुळे परिसरात तणाव निर्माण झाला असून या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी शिवसैनिकांनी केली आहे.



पैसे वाटणाऱ्यांना रंगेहाथ पकडले या प्रकरणावर प्रतिक्रिया देताना अंबादास दानवे यांनी भाजपवर सडकून टीका केली. ते म्हणाले, रात्री शहरातील अनेक ठिकाणांवरून फोन आलेत. एका ठिकाणी शिवसैनिकाने पैसे वाटताना बघितले, रंगेहाथ पकडले आणि भाजपच्या लोकांना चांगले चोपले. या झटापटीत भाजपचे काही लोक पळून गेले. यावेळी पाकिट देखील पकडले. माझ्याकडे त्या पाकिटांचा फोटो आणि व्हिडिओ आहे.

अंबादास दानवे म्हणाले, काहीही करा, पैसे वाटणाऱ्या भाजपच्या लोकांना चोप द्या, असा आता उद्धवजींचा आदेश आहे. त्याला सगळे माफ आहे. निवडणूक आयोग काही करत नाहीये. पोलिसही काही करू शकणार नाहीत आणि भाजप देखील या प्रकरणी तक्रार करू शकत नाही. छत्रपती संभाजीनगर शहरात भाजपने पैसे वाटायला सुरुवात केली आहे. कारण देशात आणि राज्यात खूप काम केल्याचे ते सांगतात. त्यामुळे त्यांना घरोघरी पैसे वाटावे लागतात, असा टोला ठाकरे गटाचे नेते अंबादास दानवे यांनी लगावला.

दुसरीकडे, गारखेडा परिसरातूनही एक संशयास्पद व्हिडिओ समोर आला आहे. या व्हिडिओमध्ये एका व्यक्तीला "पैसे का वाटताय?" असा जाब काही लोक विचारताना दिसत आहेत. संबंधित व्यक्तीच्या खिशात ५०० रुपयांच्या नोटांचे मोठे बंडल दिसून येत आहे. हे पैसे मतदारांना वाटण्यासाठीच आणल्याचा दावा केला जात आहे. मात्र, हा व्हिडिओ नेमका कोणत्या पक्षाच्या कार्यकर्त्याचा आहे आणि कधीचा आहे, याबाबत अद्याप अधिकृत पुष्टी मिळालेली नाही.

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेसाठी उद्या मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. प्रचाराच्या तोफा थंडावल्यानंतर आता अशा प्रकारे 'पैशांच्या पावसा'चे आरोप झाल्याने निवडणूक आयोगापुढील आव्हान वाढले आहे. शहरात कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून पोलिसांनी बंदोबस्त वाढवला असून, मतदानाच्या दिवशी प्रशासन कशी खबरदारी घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## मनसेला मुंबई उच्च न्यायालयाचा झटका

### बिनविरोध निवडीविरोधातील याचिका फेटाळली

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १४ :



राज्यातील महानगरपालिका निवडणुकीच्या धामधुमीत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला (मनसे) कायदेशीर आघाडीवर मोठा धक्का बसला आहे. पालिका निवडणुकीतील उमेदवारांच्या बिनविरोध निवडीला आव्हान देणारी मनसे नेते अविनाश जाधव यांची याचिका मुंबई उच्च न्यायालयाने फेटाळून लावली आहे. केवळ याचिका फेटाळलीच नाही, तर चुकीची माहिती देऊन न्यायालयाची दिशाभूल केल्याबद्दल खंडपीठाने याचिकाकर्त्यांना चांगलेच धारेवर धरले.

आज सकाळी जेव्हा या याचिकेचा उल्लेख झाला, तेव्हा ही याचिका आधीपासून प्रलंबित असलेल्या इतर याचिकांसारखीच असल्याचे न्यायालयाला सांगण्यात आले होते. मात्र, सुनावणी सुरू झाल्यावर ऑनलाईन उपस्थित असलेले ज्येष्ठ वकील असीम सरोदे यांनी स्पष्ट केले की, ही याचिका इतर प्रलंबित प्रकरणांसारखी नसून थेट निवडणुकीशी संबंधित आहे. याचिकाकर्त्यांच्या या परस्परविरोधी विधानांमुळे मुख्य न्यायाधीश एस. चंद्रशेखर आणि न्यायमूर्ती गौतम ए. अंखड यांचे खंडपीठ कमालीचे संतप्त झाले.

खंडपीठाने याचिकाकर्त्यांच्या वकिलांना जाब विचारत म्हटले की, "सकाळी तुम्ही ही याचिका इतर याचिकांसारखीच असल्याचे चुकीचे विधान केले. एखाद्या पक्षकारासाठी अशी चुकीची माहिती देण्यामागे तुमची कोणती घाई किंवा भीती होती?" चुकीची माहिती दिल्याबद्दल न्यायालयाने सुरुवातीला याचिकाकर्त्यांना दंड ठोठावण्याचे संकेत दिले होते.

न्यायालयाने सुरुवातीला दंडात्मक कारवाई करण्याची भूमिका घेतली होती, मात्र दीर्घ युक्तिवादानंतर न्यायालयाने दंड न आकारण्याचा निर्णय घेतला. असे असले तरी, बिनविरोध निवडीच्या प्रक्रियेत हस्तक्षेप करण्यास नकार देत न्यायालयाने अविनाश जाधव यांची ही याचिका फेटाळून लावली आहे.

## काँग्रेस उमेदवाराच्या पतीवर तलवारीने हल्ला

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १४ :

नांदेड येथील काँग्रेसच्या एका महिला उमेदवाराच्या पतीवर अज्ञात व्यक्तींनी तलवारीने हल्ला केल्याची भयंकर घटना घडली आहे. काँग्रेसने या घटनेची गंभीर दखल घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस महाराष्ट्राचा बिहार करण्याची इच्छा आहे. त्यांनी निवडणूक कूनितीची फळे आज महाराष्ट्र भोगत आहे, असे काँग्रेसने म्हटले आहे.

राज्यात सध्या मुंबईसह 29 महापालिकांच्या निवडणुकांची रणधुमाळी सुरू आहे. आता प्रचाराच्या तोफा थंडावल्या आहेत. उद्या मतदानानंतर महापालिकांत कुणाची सत्ता येणार? हे स्पष्ट होणार आहे. या पार्श्वभूमीवर नांदेडमध्ये निवडणूक प्रचाराच्या शेवटच्या दिवशी काँग्रेस उमेदवाराच्या पतीवर तलवारीने हल्ला केल्याची घटना घडली आहे.

नांदेड शहरातील भाग्यनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील शंकरनगर येथे मंगळवारी सायंकाळी ही घटना घडली आहे. येथील वंचित बहुजन आघाडी व काँग्रेसच्या उमेदवार सारिका शिवाजी भालेराव हे शंकरनगर येथील आपल्या निवासस्थानी आपल्या गल्लीतील काही लोकांसोबत गप्पा मारत बसले होते.

त्यावेळी दुचाकीवरून आलेल्या हल्लेखोरांनी त्यांच्यावर तलवारीने हल्ला चढवला. पण शिवाजी भालेराव यांनी प्रसंगावधान राखून हा वार चुकवला. या झटापटीत ते खुर्चीवरून खाली पडले. यावेळी हल्लेखोरांनी त्यांच्यावळची बॅगही पळवली. पोलिसांच्या मते, हा हल्ला चौरीच्या हेतूने करण्यात आला होता. सर्व हल्लेखोरांनी रुमालाने आपले तोंड लपवले होते. तू प्रचार कसा करतोस? खूप भाषणे ठोकतोस? तुझी बियार्णी करून टाकू? अशी धमकी हल्लेखोरांनी यावेळी भालेराव यांना दिली.

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी या घटनेची गंभीर दखल घेतली आहे. या प्रकरणी त्यांनी थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर निशाणा साधला आहे. ते म्हणाले, नांदेड महानगरपालिकेतील प्रभाग क्रमांक 1 मध्ये काँग्रेस पक्षाच्या उमेदवाराच्या पतीवर अज्ञात व्यक्तींनी तलवारीने प्राणघातक हल्ला केल्याची गंभीर व खळबळजनक घटना घडली आहे.

## महाबळेश्वरला फिरायला नेण्याच्या बहाण्याने

# ताम्हिणी घाटात खून

■ वृत्तसंस्था, पुणे, दि. १४

महाबळेश्वरला फिरायला नेण्याच्या बहाण्याने मित्रांनी ताम्हिणी घाटात एका तरुणाचा खून केल्याची घटना उघडकीस आली आहे. मृतदेहाची विल्हेवाट लावून मित्राची कार घेऊन पसार झालेल्या दोघा आरोपींना बाणेर परिसरातून अटक करण्यात आली. आरोपी मृत तरुणाची कार विकण्याच्या प्रयत्नात होते, अशी माहिती तपासात समोर आली आहे.

आदित्य गणेश भगत (वय २२, रा. साई रेसिडेन्सी, इंद्रायणीनगर, भोसरी, मूळ रा. चोबे पिंपरी, ता. माढा, जि. सोलापूर) असे खून झालेल्या तरुणाचे नाव आहे. आदित्यचा मृतदेह ११ जानेवारी रोजी ताम्हिणी घाटात सणसवाडी गाव परिसरात आढळला होता. त्याच्यावर तीक्ष्ण शस्त्राने वार करण्यात आले होते. सुरुवातीला मृतदेहाची ओळख पटली नव्हती, मात्र आदित्यच्या हातातील इलेक्ट्रॉनिक घड्याळामुळे त्याची ओळख पटली. या प्रकरणी अनिकेत महेश वाघमारे (वय २६, रा. लक्ष्मी विहार अपार्टमेंट, हिंगणे खुर्द, सिंहगड रस्ता) आणि तुषार उर्फ सोन्या शरद पाटोळे (वय २४, रा. सुशील गंगा अपार्टमेंट, कर्वेनगर) यांना अटक करण्यात आली आहे. प्रज्वल ऊर्फ सोन्या संतोष हंबीर (रा. वारजे माळवाडी) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल असून, पोलीस त्याचा शोध घेत आहेत.

माणगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक निवृत्ती बोऱ्हाडे यांनी दिलेल्या माहितीनुसार, अनिकेत, तुषार आणि प्रज्वल हे आदित्यच्या कारमधून महाबळेश्वरला फिरायला निघाले होते. आर्थिक वादातून तिघांनी आदित्यवर तीक्ष्ण शस्त्राने वार करून त्याचा खून केला आणि मृतदेह घाटात फेकून दिला. सहायक निरीक्षक श्रीकांत किरवले, नरेंद्र बेलदार आणि पथक आरोपींचा शोध घेत होते. दरम्यान, बाणेर पोलीस ठाण्याच्या तपास पथकातील पोलीस कर्मचारी प्रीतम निकाळजे हे मुंबई-बंगळुरू बाह्यवळण मार्गावर गस्त घालत असताना त्यांना माहिती मिळाली की, आरोपी अनिकेत ननावरे पुलाजवळ कार विकण्याच्या तयारीत आहे. पोलिसांनी सापळा रचून अनिकेतला पकडले आणि त्याच्या ताब्यातून चोरीची कार जप्त केली. चौकशीदरम्यान, अनिकेतने तुषार आणि प्रज्वल यांच्या मदतीने आदित्यचा खून केल्याची कबुली दिली. आरोपी अनिकेत आणि तुषार यांच्याविरुद्ध यापूर्वीही गुन्हे दाखल आहेत.

## दुचाकीस्वार तरुणाचा मृत्यू

■ वृत्तसंस्था, पुणे, दि. १४

पुण्यातील येरवड्यातील शास्त्रीनगर चौकात एका खासगी बसने दुचाकीला धडक दिल्याने दुचाकीस्वार तरुणाचा मृत्यू झाला. बसचालकाला अटक करण्यात आली आहे. मृत्यू झालेल्या तरुणाचे नाव हर्ष लाड असे आहे, तर करण अमित जाधव (वय 21, रा. कल्पतरु सोसायटी, बोरीवली, मुंबई) हा जखमी झाला आहे. प्रवासी वाहतूक करणाऱ्या बसचा चालक जयवंत हरिभाऊ बोरेकर (वय 46, रा. खडकी बुद्रुक, ता. मंगळूरपीर, जि. अकोला) याला लक्ष्मीनगर पोलिसांनी अटक केली आहे.

## निवडणुकीसाठी पोलीस यंत्रणा सज्ज

### १३०६ पिस्तुले जमा

■ महासागर प्रतिनिधी पिंपरी चिंचवड, दि. १४ :

पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीसाठी उद्या (गुरुवारी) होणारे मतदान आणि शुक्रवारी होणारी मतमोजणी प्रक्रिया शांततेत पार पडण्यासाठी पोलिसांनी तगडा बंदोबस्त तैनात केला आहे. सह पोलीस आयुक्त, दोन अपर पोलीस आयुक्त, आठ पोलीस उपायुक्त, विविध पथकांच्या कंपन्यांसह ६ हजार ९१ पोलीस सज्ज असणार आहेत.

आचारसंहिता लागू झाल्यापासून आजपर्यंत ९६२ जणांवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली आहे. ५० उपद्रवींना जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आले आहे. गुंडगिरी प्रवृत्तीच्या ४३८ जणांना शहराच्या हद्दीबाहेर जाण्याचे आदेश देण्यात आले आहेत. निवडणूक अनुषंगाने परवानाधारकांची एकूण १ हजार ३०६ पिस्तुले जमा केली आहेत.

महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर सर्वच पोलीस ठाण्याच्या हद्दीत कोम्बिंग ऑपरेशन, पथसंचलन तसेच मोठ्या प्रमाणात प्रतिबंधात्मक कारवाई केल्यानंतर प्रत्यक्ष निवडणूक प्रक्रियेसाठी पोलिसांनी कंबर कसली आहे. त्यानुसार, पोलीस आयुक्त, सह आयुक्त, दोन अपर पोलीस आयुक्त यांच्यासह ६ हजार ९१ पोलिसांचा फौजफाटा शहरात तैनात असणार आहे. पोलिसांची विशेष पथकेही शहरात गस्तीवर असणार आहेत. गर्दी होणाऱ्या किंवा वाहतुकीचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता असणाऱ्या केंद्रांवर पोलीस आणि वाहतूक पोलिसांचा विशेष बंदोबस्त असणार आहे.

महापालिका निवडणूक भयमुक्त, पारदर्शक व निःपक्षपातीपणे पार पडावी, यासाठी पोलीस दल सज्ज झाले आहेत. सर्वत्र कडेकोट पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. सर्व हालचालींवर करडी नजर ठेवली जात आहे. पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत एकूण ४२० इमारतींमध्ये २ हजार १३५ मतदान केंद्र आहेत. आचारसंहितेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी एकूण ३४ तपासणी पथके तयार करण्यात आली आहेत. त्याकरीता ६८ पोलीस अंमलदार नेमण्यात आले आहेत. आजपर्यंत पोलीस आयुक्तालय हद्दीत दैनंदीन तपासणी दरम्यान एकूण १६ लाख १७ हजाराची रोकड जप्त करून ताब्यात घेण्यात आली आहे. निवडणूक अनुषंगाने परवानाधारकांची एकूण १ हजार ३०६ पिस्तुले जमा केली आहेत. आचारसंहिता लागू झाल्यापासून महाराष्ट्र दारूबंदी कायद्याअंतर्गत २७६ छापे घालून एकूण १० लाख ३६ हजार ९७२ रुपए किमतीचा मद्याचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

## 'वंदे भारत'मध्ये गुजराती भाषेला मानाचे पान

# मायमराठी चौथ्या क्रमांकावर

■ महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १४ :



एका बाजूला मराठी माणूस एकवटला असतांनाच मराठी माणसाच्या जखमेवर मीठ चोळण्याचे षडयंत्र रेल्वे कडून होत असल्याचे दिसून येते. भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते राम नाईक हे रेल्वे राज्यमंत्री असतांना राज्यात राज्यभाषा, मग राष्ट्रभाषा हिंदी (जी अधिकृत नाही) आणि मग आंतरराष्ट्रीय भाषा इंग्रजी असे त्रिभाषा सूत्र ठरविले होते.

परंतु पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुरु केलेल्या महत्वाकांक्षी 'वंदे भारत' या संपूर्ण पंचतारांकित सुपरफास्ट एक्स्प्रेस मध्ये त्रिभाषा सूत्र चक्क धाब्यावर बसविण्यात आले असून गुजराती भाषेला मानाचे पान देतांनाच मायमराठी भाषेला अगदी चौथ्या क्रमांकावर टाकण्यात आले आहे. त्यामुळे मुंबईकर प्रवाशांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. 'वंदे भारत' ही सुपरफास्ट पंचतारांकित एक्स्प्रेस अहमदाबाद येथून मुंबई सेंट्रल येथे येतांना जी उद्घोषणा करण्यात येते.

त्यात मराठी भाषेत सर्वप्रथम उद्घोषणा होणे अभिप्रेत आहे. परंतु तसे न होता ती 'अब थोडेही समयमें यह ट्रेन...... स्टेशन तक पहोंच रही हैं' धीस ट्रेन रीच ॲट.... स्टेशन ', 'आ ट्रेन थोडाज समयमां..... स्टेशन पहोंचवानी तैयारीमां छे ', 'ही ट्रेन थोड्याच वेळात.....या स्टेशनवर पोहोचत आहे' अशा प्रकारे ऐकायला मिळते. या प्रकारे त्रिभाषा सूत्राचे उल्लंघन करण्यात येत असून मराठी माणसाच्या जखमेवर मीठ चोळण्याचा प्रकार आहे, अशा शब्दांत मुंबईकर प्रवासी संतप्त प्रतिक्रिया देत आहेत. मुंबई ही महाराष्ट्रापासून तोडण्याचा डाव असल्याचा होत असलेला आरोप रेल्वे खरा करु पाहते की काय? असाही प्रश्न उपस्थित करण्यात येत असल्याचे समजते.

## महापालिका मतदानाच्या पूर्वसंध्येला ठाकरे कुटुंब मुंबादेवीच्या चरणी

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १४ :

मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्या मतदानाला अवघे काही तास शिल्लक असतानाच, ठाकरे बंधूंनी मुंबईकरांचे लक्ष वेधून घेतले आहे. निवडणुकीच्या या अत्यंत निर्णायक टप्प्यावर उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे एकत्र आले असून, त्यांनी आज मुंबईची ग्रामदेवता असलेल्या मुंबादेवीचे दर्शन घेतले. "महापालिकेत सत्ता येऊ दे," असे साकडे यावेळी दोन्ही बंधूंनी देवीला घातल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

मुंबादेवीच्या दर्शनाला जाण्यापूर्वी सकाळी उद्धव ठाकरे हे राज ठाकरे यांच्या 'शिवतीर्थ' या निवासस्थानी दाखल झाले होते. यावेळी दोन्ही पक्षांच्या महत्त्वाच्या



उमेदवारांच्या प्रतिनिधींची एक विशेष बैठक आयोजित करण्यात आली होती.

(१५ जानेवारी) होणाऱ्या मतदानाच्या पार्श्वभूमीवर, मतदान केंद्रांवर नेमकी काय काळजी घ्यावी, या संदर्भात दोन्ही नेत्यांनी कार्यकर्त्यांना आणि प्रतिनिधींना महत्त्वाच्या सूचना दिल्या.

मतदान प्रक्रियेत कोणतीही त्रुटी राहू नये आणि मतदारांना केंद्रापर्यंत आणण्यासाठी कशा प्रकारे समन्वयाने काम करावे, याचा 'कानमंत्र' यावेळी देण्यात आला. बैठक संपल्यानंतर ठाकरे बंधू थेट मुंबादेवी मंदिराकडे रवाना झाले.

यावेळी मुंबादेवी मंदिर परिसरात शिवसेना ठाकरे गट आणि मनसे कार्यकर्त्यांनी गर्दी केली होती. कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी प्रशासनाकडून कडक सुरक्षा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. मंदिरात विधीवत पूजा केल्यानंतर ठाकरे कुटुंबाने देवीचा आशीर्वाद घेतला.

यावेळी राज ठाकरे, उद्धव ठाकरे, अमित ठाकरे, आदित्य ठाकरे, रश्मी ठाकरे, शर्मिला ठाकरे उपस्थित होते. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, मुंबई महापालिकेवर पुन्हा एकदा भगवा फडकू दे आणि शिवसेनेच्या हाती सत्ता येऊ दे, अशी प्रार्थना यावेळी करण्यात आली.

# महिला सक्षमीकरणासाठी आदिशक्ती अभियान : जिल्हाधिकारी

**अकोला,दि.१४ (प्रतिनिधी)▪**

आदिशक्ती अभियान गावोगाव उत्कृष्टपणे राबविण्याचे निर्देश जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी आज दिले.जिल्हास्तरीय समितीची बैठक जिल्हाधीकारी वर्षा मीना यांच्या अध्यक्षतेत झाली, त्यावेळी त्या बोलत होत्या.महिला सक्षमीकरणासाठी आदीशक्ती अभियान राबविण्यात येत असून गावोगाव प्रभावी अंमलबजावणी व्हावी.

ग्रामपंचायतीना तालुका ते राज्यस्तरापर्यंत लाखो रूपयांची बक्षीसे जिंकण्याची संधी मिळणार आहे, असे जिल्हाधिकारी श्रीमती मीना यांनी यावेळी सांगितले.विशेष अभियानांतर्गत जिल्हयात ग्रामस्तरीय समित्या गावोगाव स्थापन झाल्या आहेत. ७ तालुकास्तरीय समित्यांचे गठन करण्यात आले.अभियानात गावोगाव ग्रामसेवक यांनी ुलवरवहळीहरज्ञींळ.ळप या पोर्टलवर ग्रामपंचायतीची नोंद करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी यांनी केली.

शासनाकडून राबविण्यात येणाऱ्या योजनांचालाभसमाजातीलशेवटच्याघटकातील महिलांपर्यंत पोहचविणे, राज्यातील महिलांच्या आर्थिक, सामाजीक, शैक्षणीक, आरोग्य विषयक समस्यांबाबत समाजात संवेदनशीलता निर्माण करणे जनजागृतीच्या माध्यमातून चळवळ निर्माण करून कायमस्वरूपी उपाययोजना करणे हा या अभियानाचा मुख्य उदेश आहे.जिल्हयात या अभियानांतर्गत जनजागृती सुरू असून



माहीती या अभियानांतर्गत दिनांक १ जानेवारी ते ३१ डिसेंबर या कालावधीत आदीशक्ती अभियानच्या शासन निर्णयाम ध्ये ठरवन दिल्यानुसार झालेल्या कामांचे मुल्यांकन करून ग्रामपंचायतील पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

या पुरस्काराअंतर्गत तालुकास्तरावर प्रथम बक्षीस १ लाख, द्वितीय ५० हजार व तृतीय २५ हजार असे आहे.जिल्हा स्तरावर प्रथम बक्षीस ५ लाख व्दितीय ३ लाख तृतीय १ लाख आहे शिवाय राज्य स्तरावर प्रथम बक्षीय १० लाख, व्दितीय बक्षीस ७ लाख व तृतीय ५ लाख आहे. असे श्रीमती राजश्री कौलखेडे जिल्हा कार्यक्रम अधिकारी यांनी सांगितले.ग्राम चळवळीतून महिलांच्या समस्यांचे महत्व जाणुन घेणे व महिलांच्या आरोग्य समस्यांचे महत्व जाणून घेणे व महिलांच्या आरोग्य समस्यांचे निवारण करणे सक्षम समाज निर्माण करणे. लिंगभेदात्मक विचारसरणीला आव्हान देवुन किशोरवयीन मुलींमध्ये शिक्षणाचे प्रमाण वाढविणे व बालविवाहमुक्त समाज निर्माण करणे तसेच लैंगीक, शारीरीक अत्याचाराला प्रतिबंध करून हिंसाचारमुक्त कुटुंब व समाज निर्माण करणे व अनिष्ट रूढींचे निर्मुलन करणे, महिला नेतृत्वाला सक्षम करून पंचायत राज पध्दतीमध्ये त्यांचा सहभाग वाढवीणे, महिला किशोरी यांना शिक्षण रोजगार, निर्णय व मालमत्ता हक्क यामध्ये समान संधी निर्माण करून शासकीय योजनांचा लाभ व स्वयंरोजगारांच्या संधीच्या माध्यमातुन आर्थिक उन्नत स्त्री संकल्पना राबवीणे हे आदिशक्ती अभियानांचे उददीष्टे आहेत आदीशक्ती अभियानांतर्गत उत्कृष्ट कामगीरी करणा. या ग्रामपंचायतींना बक्षीस देऊन गौरवीण्यात येणार आहे.

# आकाशात पतंग,चेहऱ्यावर हसू मूर्तीजापूरात मकरसंक्रांतीचा रंगतदार उत्सव

### वृंदावन नगरात उज्वल ठाकरे मित्र परिवाराचा सामाजिक फेस्टिव्हल मोमेंट' लहानग्यांच्या हाती पतंग, मनात आनंद

**मुर्तिजापुर,दि.१४ (प्रतिनिधी)▪**

मकरसंक्रांतीच्या पवित्र सणाला मूर्तीजापूर शहरातील वृंदावन नगर परिसर अक्षरशः उत्सवमय झाला. निळ्याशार आकाशात रंगीबेरंगी पतंगांची उधळण, गल्लीत गल्लीत धावणारी लहान मुलं आणि त्यांच्या चेहऱ्यावर ओसंडून वाहणारा आनंदह्हा सारा देखावा जणू एखाद्या चित्रपटातील प्रसंगासारखा भासत होता. या आनंदी क्षणांना कारण ठरला सोनोरी ग्रामपंचायत सदस्य श्री. उज्वल ठाकरे व त्यांच्या मित्र परिवारातर्फे आयोजित केलेला पतंग वाटपाचा सामाजिक उपक्रम.

मकरसंक्रांती आणि पतंग यांचे नाते जपत, लहानग्यांना सणाचा खरा आनंद मिळावा, या भावनेतून हा उपक्रम राबवण्यात आला. पतंग हातात पडताच मुलांच्या आनंदाला उधाण आले. यावेळी बोलताना उज्वल ठाकरे म्हणाले की, सण-उत्सव हे केवळ परंपरेपुरते मर्यादित नसून समाजाला जोडणारे बंध आहेत. लहान मुलांच्या चेहऱ्यावरचे हसू हेच या उपक्रमाचे खरे यश असल्याचे त्यांनी नमूद केले. हा उपक्रम संस्कृती जपण्याचा आणि पुढील पिढीपर्यंत तिची गोडी पोहोचवण्याचा छोटासा प्रयत्न आहे, असेही त्यांनी सांगितले.



कार्यक्रमाला परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. उज्वल ठाकरे मित्र परिवारातील सुनील वानखडे, मयूर गावंडे, शुभम उमाळे, सचिन गोरले, राकेश बोयेत, मनोज कांबळे, कुणाल मांजरे, अथर्व गादे, दीप राऊत, आदित्य चव्हाण, अभिषेक आढाउ, आदित्य सोनवणे, प्रेम सोळंके, कार्तिक मिश्रा, कार्तिक गावंडे व शिवांश गवळी यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले. 'तिळगूळ घ्या आणि गोड गोड बोला' या संदेशासह उत्साहपूर्ण वातावरणात कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## विनयभंगाच्या गुन्ह्यातील आरोपीस शिक्षा

**तेल्हारा,दि.१४ (प्रतिनिधी)▪**

२० वर्षीय विवाहितेचा विनयभंग केल्याप्रकरणी न्यायप्रविष्ट केस नंबर आरसीसी नं. २९/२०१८ दि. ५ फेब्रुवारी २०१८ या गुन्ह्यातील आरोपी संजय मुकिंदा बोदडे रा. जाफरापूर ता. तेल्हारा जि. अकोला यास कलम २४८ (२) सीआरपीसी प्रमाणे दोषी ठरवून कलम ३५४ भादवि मध्ये सहा महिने साधी कैद व एक हजार रुपये दंड, दंड न भरल्यास एक महिना शिक्षा तसेच कलम ३२३ भादवि मध्ये. रुपये दंड, दंड न भरल्यास १५ दिवस शिक्षा सोमवारी दि. १२ जानेवारी २०२६ रोजी विद्यमान तेल्हारा न्यायाधीशांनी दिली आहे.

# अकोला जिल्हा परिषद आरोग्य विभागाच्या वतीने सिकलसेल मोहीम

### संगीता जाधव स्वास्थ अभ्यंगता यांनी केले बंजारा भाषेत सिकलसेल मोहिमेचा लाभ घेण्याचे आवाहन

**अकोला,दि.१४ (प्रतिनिधी)▪**

प्राथमिक आरोग्य केंद्र पातुर स्वास्थ अभ्यंगता संगीता जाधव प्राथमिक आरोग्य केंद्र पातुर तालुका पातुर जिल्हा अकोला येथे स्वास्थ अभ्यंगता या पदावर कार्यरत असलेल्या संगीता जाधव यांनी बंजारा भाषेत व्हिडिओ बनवून व बंजारा वेशभूषा परिधान करून महाराष्ट्रातील बंजारा समाजाच्या तांडा वस्ती मधील लोकांना सिकल सेल आजारावर १५ जानेवारी ते ७ फेब्रुवारी या काळात मोहिमेचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे. १५ जानेवारी ते ७ फेब्रुवारी पर्यंत सिकलसेल आजाराची रक्ताच्या तपासणीची मोहीम असून अकोला जिल्ह्यात आरोग्य विभाग मार्फत जिल्हा आरोग्य अधिकारी माननीय डॉक्टर बळीराम गाढवे साहेब यांच्या मुख्य मार्गदर्शनाखाली गावोगावी संपूर्ण समुदायातील लोकांना आव्हान करण्यात येते की विवाहपूर्वी सिकलसेल आजाराच्या रक्ताची तपासणी जास्तीत जास्त प्रमाणात करून या गंभीर आजारावर आपण नियंत्रण ठेवू शकतो आरोग्य विभागात उपकेंद्रस्तरावर प्राथमिक



आरोग्य केंद्रस्तरावर सिकलसेल आजारांच्या रक्ताच्या तपासण्या औषध उपचार संपूर्णतः मो मोफत आहे परंतु जास्तीत जास्त समुदायातील लोकांनी मोफत *औषध उपचार व रक्ताच्या तपासणीचा लाभ घ्यावा असे आव्हान आरोग्य विभाग मार्फत करत आले आहे*० ते ४० वर्षे वयोगटातील लाभार्थींच्या जास्तीत जास्त प्रमाणात रक्ताच्या, विशेषतःहा विवाहपूर्व घ्या करून तपासण्या तरच ह्या गंभीर सिकलसेल आजारावर नियंत्रण ठेवू शकणार व जवळच्या उपकेंद्र व प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर मोफत औषधोपचार सुरू करून आयुष्यभर सुखरूप आयुष्य जगु शकतात,त्यांनी बनवलेल्या व्हिडिओचा सर्वत्र कौतुक करण्यात येत आहे.

## थोडक्यात

### रविवारी मध्यस्थी परिचय पुस्तिकेचा प्रकाशन सोहळा

**अकोट :** श्री संत वासुदेव महाराज ज्ञानपीठ संस्थेअंतर्गत मध्यस्थी वधू वर सूचक मंडळ द्वारा सन २०२६ च्या वधू-वर परिचय पुस्तिकेच्या वार्षिकांकाचे प्रकाशन रविवार दिनांक १८ जानेवारी रोजी सकाळी १० वाजता संपन्न होत आहे. या पुस्तिकेचे प्रकाशन आदीशक्ती श्री संत मुक्ताई संस्थान मुक्ताईनगरचे अध्यक्ष रविंद्र उपाख्य भैय्यासाहेब पाटील यांच्या हस्ते होत असून अध्यक्षस्थानी ज्ञानपीठ संस्थेचे अध्यक्ष ह.भ.प. वासुदेवराव महल्ले राहणार आहेत. मध्यस्थी मंडळ गत १३ वर्षापासून समाजातील मुलामुलींचे विवाह जुळून आणण्यासाठी निष्कामपणे विविध उपक्रम राबवित आहे. राज्यभरातून समाजातील सर्व स्तरातील मुला मुलींची नोंदणी मंडळाकडे झाली असून त्यांची परिचयात्मक माहिती पुस्तिकेत समाविष्ट करण्यात आली आहे. या पुस्तिकेला महाराष्ट्रातून मागणी असून आपल्या मुला-मुलींसाठी अनुरूप व योग्य स्थळ शोधण्यासाठी पालकांना ही पुस्तिका उपयुक्त ठरणार आहे. या प्रकाशन सोहळ्याला युवक युवती व त्यांचे पालक तथा समाज बांधवांनी उपस्थित राहावे, असे आवाहन मंडळाचे अध्यक्ष बाळासाहेब फोकमारे व सदस्यांनी केले आहे.

### गुन्ह्यातील विनयभंगाच्या आरोपीस शिक्षा

**तेल्हारा :** २० वर्षीय विवाहितेचा विनयभंग केल्याप्रकरणी न्यायप्रविष्ट केस नंबर आरसीसी नं. २९/२०१८ दि. ५ फेब्रुवारी २०२८ या गुन्ह्यातील आरोपीस विद्यमान तेल्हारा न्यायाधीशांनी सोमवार दि. १२ जानेवारी २०२६ रोजी आरोपी नामे संजय मुकिंदा बोदडे रा. जाफरापूर ता. तेल्हारा जि. अकोला यास कलम २४८ (२) सीआरपीसी प्रमाणे दोषी ठरवून कलम ३५४ भादवि मध्ये सहा महिने साधी कैद व एक हजार रुपये दंड, दंड न भरल्यास एक महिना शिक्षा तसेच कलम ३२३ भादवि मध्ये. ५००/- रुपये दंड, दंड न भरल्यास १५ दिवस शिक्षा देण्यात आली आहे. एका गावातील फिर्यादी २० वर्षीय विवाहिता गेल्या ३१ डिसेंबर २०१७ रोजी सायंकाळी ७.३० वाजे दरम्यान महिलांचे गोदरीत शौचास गेली असता आरोपीने तिचा विनयभंग केला व तोंड दाबले. तिने आरडा ओरड केली असता आरोपी पळून गेला होता. याप्रकरणी तेल्हारा पोलीस स्टेशन मध्ये तक्रारीवरून आरोपी संजय मुकिंदा बोदडे रा. जाफरापूर ता. तेल्हारा विरुद्ध घटनेच्या दिवशी रात्री ९.३७ वाजेदरम्यान फिर्याद नोंदविण्यात आली होती.

# हिवरखेडच्या नगर परीषदेच्या उपाध्यक्ष पदी भाजपाच्या प्रतीभा विरेंद्र येऊल यांची निवड

### स्विकृत सदस्यपदी दोन्ही गटाकडुन दोन पत्रकार

**हिवरखेड,दि.१४ (प्रतिनिधी)▪**

हिवरखेडच्या ऐतीहासिक प्रथम निवडनूकीत नगराध्यक्ष सौ सूलभा रमेश दुतोंडे जनतेतुन तर ऊपाध्यक्षपदाकरीता निवडुन आल्या अकरा नगर सेवका मधुन एकमेव अर्ज दाखल करर्नाया भाजपाच्या सौ प्रतीभा विरेद्र येऊल ह्या ऊपाध्यक्ष म्हनून काल निवडल्या गेल्या

भाजपा कडुन स्विकृत सदस्य म्हनून भाजपा नगर अध्यक्ष पत्रकार कीरण सेदानी यांची निवड झाली तर वीरोधीपक्ष म्हनून शिदेच्या शिवसेनेगटाचे रवीराणा घुंगड कडून शामशिल भोपळे पत्रकार याची सूद्दा स्विकृत सदस्य म्हनून निवड झालीऊपाध्यक्ष झालेल्या सौ प्रतीभा येऊल व नगराध्यक्ष ह्या दोन्ही महीला मैत्रीनी असून दोन्ही हिवरखेडच्या माजी सरपंच सूद्धा राहलेल्या



आहेत निवड होताच पक्षाचे प्रदोत रणधिर सावरकर पालकमंत्री ना आकाश फुंडकर यूवा खा अनुप धोत्रे विकासमहर्षी आमदार प्रकाश भारसाकळे याचे व जिल्हाअध्यक्ष संतोष शिवरकर यांचे मार्गदर्शनात व भाजपा नेते रमेश दुंतोडे यांचे नेतृत्वात सर्वाची गुलाल व फटाकेच्या आतीषबाजीत खुल्या जीप्सीमधे डी जे कम बॅड पथकचे सहाय्याने मिरवनूक काढुन सर्व नगर सेवकाचा भाजपा प्रेमीकडुन जयदेव पोके यांचे अध्यक्षते खाली छोटेखानी सभा बैठकी मधे सत्कार करन्यात आला यावेळी भाजपा नेते रमेश दुंतोडे नगराध्यक्ष सुलभाताई दुतोंडे ऊपाध्यक्ष प्रतीभा येऊल मधुकर पोके कीरण सेदाणी यानी व नगरसेवकाकडून मतदारबांधवाचे आभार मानन्यात आले या कार्यक्रमाचे संचालन केशव कोरडे व आभार प्रदर्शन सूदाम राऊत यानी ऊपस्थिताचे आभार मानले.

## पोलिस विभाग ॲक्शन मोडवर,निवडणूक विभागाची तयारी पूर्ण

**अकोला,दि.१४ (प्रतिनिधी)▪**

उद्या होणाऱ्या महानगरपालिकेच्या मतदानासाठी पोलिस यंत्रणा सज्ज झाली आहे. मतदानाची प्रक्रिया शांततेत पार पडावी, यासाठी १ हजार २२६ जवान तैनात करण्यात आले आहेत. यामध्ये अकोला जिल्हा पोलिस दलाकडून उपविभागीय पोलिस अधिकारी,पोलिस निरीक्षक, सहायक पोलिस निरीक्षक, उपनिरीक्षक, पोलिस कर्मचारी, एसआरपीएफ, होमगार्ड यांचा समावेश आहे. ६३० मतदान केंद्रांपैकी ६४ मतदान केंद्र संवेदनशील म्हणून घोषित करण्यात आल्याने या ठिकाणी अतिरिक्त पोलिस बल तैनात करण्यात आले आहे.

शहरात २८ सेक्टर तयार करण्यात आले असून, प्रत्येक सेक्टरमध्ये पेट्रोलिंगसाठी एक पोलिस उपनिरीक्षक, दोन पोलिस कर्मचारी व तीन होमगार्डस असा बंदोबस्त राहणार आहे. या शिवाय प्रत्येक पोलिस स्टेशन स्तरावर राखीव बंदोबस्त ठेवण्यात आला.

# तेल्हारा नगर परिषदेच्या उपाध्यक्षपदी सचिन तायडे तर स्वीकृत सदस्य पदी गजाननभाऊ गायकवाड

### मोनिकाताई वाघ यांची अविरोध निवड



**तेल्हारा,दि.१४ (प्रतिनिधी)▪**

येथील नगर परिषदेत नगराध्यक्ष सह २१ संख्या असलेल्या तेल्हारा नगरपरिषद मध्ये सत्ताधारी भाजपच्या उपाध्यक्षपदी सचिन तायडे तर स्वीकृत सदस्या पदी गजानन गायकवाड व मोनिकाताई वाघ यांची अविरोध निवड करण्यात आली. नुकत्याच झालेल्या तेल्हारा नगर परिषदेच्या निवडणुकीत भाजपाने १३ जागा जिंकत बहुमत प्राप्त केले. उप अध्यक्ष व स्वीकृत सदस्यांसाठी आज दिनांक १३ जानेवारी २०२६ निवड करण्यात आली. तेल्हारा नगरपरिषद उपाध्यक्षपदी सचिन तायडे तर स्वीकृत सदस्य पदी गजानन भाऊ गायकवाड व मोनिकाताई वाघ यांची अविरोध निवड झाली.

# लातूर जवाहर नवोदय विद्यालयातील १२ वर्षीय स्व.अनुष्का किरण पाटोळे हिच्या संशयास्पद मृत्युप्रकरणी त्वरीत एसआयटी स्थापन करा

### मातंग समाज संघर्ष समिती अकोलाची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**अकोला,दि.१४ (प्रतिनिधी)▪**

लातूर जवाहर नवोदय विद्यालयातील १२ वर्षीय स्व. अनुष्का किरण पाटोळे हिच्या संशयास्पद मृत्युप्रकरणी त्वरीत एसआयटी स्थापन करा अशी मागणी मातंग समाज संघर्ष समिती अकोलाने मुख्यमंत्र्यांकडे केली आहे. लातूर तालुक्यातील औसा तालुक्यातील टाका गावच्या अनुसूचित जातीतील, मातंग समाजातील विद्यार्थीनीचा लातूर जवाहर नवोदय विद्यालय येथे स्व. अनुष्का किरण पाटोळे या १२ वर्षीय बालीकेचा दुर्देवी मृत्यु झाला असून हे प्रकरण अतिशय संशयास्पद आहे.

लातूर नवोदय विद्यालय प्रशासनाने या प्रकरणाला आत्महत्येचे स्वरुप दिले असून स्व. अनुष्काचे मागील काळातील वागणूक, शाळेच्या प्रत्यक कार्यक्रमात सक्रिय सहभाग, एकंदरीत धाडसी स्वभाव/व्यक्तीमत्व पाहता



एवढी हुशार मुलगी व तीही फक्त १२ वर्षांची असतांना आत्महत्येचा निर्णय कसा घेऊ शकते? असे अनेक प्रश्न अनुष्काचे कुटुंब व समाज बांधव या नात्याने आम्हाला सर्वांना पडले आहे, अनुसूचित जातीतील एक गुणवंत १२ वर्षीय विद्यार्थीनीचा जवाहर नवोदय विद्यालयामध्ये अश्या पद्धतीने मृत्यु होणे ही बाब अत्यंत गंभीर असून याबाबत सर्व समाज बांधवांच्या वतीने मुख्यमंत्र्यांना निवेदनाद्वारे एसआयटी स्थापन करुन दोषींवर कठोर कार्यवाही करण्याची मागणी करण्यात आली आहे.

# सागवानची विनापरवाना वाहतूक करणाऱ्यास अटक

### अकोला वनविभागाची हिंगणी परिसरात कारवाई

**कुटासा,दि.१४ (प्रतिनिधी)▪**

अकोला वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक) विश्वास थोरात यांच्या पथकाने सोमवारी यांनी अकोट तालुक्यात सागवानाच्या अवैध वाहतुकीविरोधात मोठी कारवाई केली.या कारवाईत अवैध सागवान लाकूड वाहतूक करणारा आरोपी शेख साजीद शेख आतीफ वय २४ वर्ष रा.केळीवेळी याला दुचाकीसह ताब्यात घेण्यात आले आहे.

सागवान अवैध वाहतुकीबाबत मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार अकोट तालुक्यातील मौजा हिंगणी परिसरात सापळा रचण्यात आला होता.दरम्यान सागवान प्रजातीच्या अवैध लाकडाची वाहतूक करणारे एक संशयास्पद वाहन दिसून आले. वन पथकाने वाहन थांबविण्याचा प्रयत्न केला असता,चालक शेख साजीद शेख



आतीफ याने पळ काढला.मात्र दहीहंडा गेट परिसरात तन पथकाने त्याचा १४ हजार रुपयांचे सागवान जप्त करण्यात आले.आरोपीकडे सागवान लाकडाच्या वाहतुकीसाठी कोणताही वैध परवाना अथवा वन विभागाचे अधिकृत दस्तऐवज आढळून आले नाहीत.याप्रकरणी वन अधिनियमांच्या विविध कलमान्वये वन गुन्हा दाखल करण्यात आला आहे.तर पाठलाग करून वाहनासह आरोपीस ताब्यात घेत वनपरिक्षेत्र अधिक थोरात यांना मिळालेल गुप्त माहितीनुसार दहीहांडा रोड परिसर नाकाबंदी करण्यात आली होती.यावेळी एमएच ३०-५४५३ क्रमांकाच्या दुचाकी थांबविण्याचा प्रयत्न केला असता आरोपीने घटनास्थळावरून पळून जाण्याचा प्रयत्न केला.पाठलाग करत त्याला पकडले.वाहनाची तपासणी केली असता मोठ्या प्रमाणात सागवान आढळून आले.

## शासकीय रेखाकला ग्रेड परीक्षेत श्रमिका पाटील राज्यात आठवी

**अकोला :** अकोला एज्युकेशन सोसायटी अकोला द्वारा संचालित स्थानिक रामदास पेठ येथील जिजाऊ कन्या विद्यालयाची विद्यार्थीनी कु. श्रमिका राम पाटील हिने राज्यस्तरीय शासकीय रेखाकला परीक्षेत घवघवीत यश संपादन केले. कु. श्रमिका पाटील



ही एलिमेंट्री परीक्षेत राज्यातून ८ वी मिरीट आली आहे.त्याचबरोबर एलिमेंटरी व इंटरमिजीएट रेखाकला परीक्षेत शाळेतील १० विद्यार्थीनी ए श्रेणीत उत्तीर्ण झाल्या आहेत.या परीक्षेत शाळेचा निकाल शंभर टक्के लागला असुन यात १६ विद्यार्थीनी बी श्रेणीत व ३० विद्यार्थीनी सी श्रेणीत उत्तीर्ण झाल्या आहेत.सर्व उत्तीर्ण विद्यार्थिनी व त्यांना मार्गदर्शन करणारे कलाशिक्षक प्रशांत हळवे यांचे यांचे शाळा व्यवस्थापन व मुख्याध्यापिका मेधा देशपांडे यांनी अभिनंदन अभिनंदन केले.

# मतदान साहित्यासह पथके रवाना

अकोला,दि.१४ (प्रतिनिधी)■
महानगर पालिका मतदानाची प्रक्रिया उद्या पार पडणार आहे. याकरिता जिल्हा प्रशासन सज्ज झाले आहे. या निवडणुकीत ४६९ उमेदवार निवडणूक रिंगणात असून उद्या ५ लाख ५० हजार हुन अधिक मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहे. या संपूर्ण प्रक्रिया करता ७ फिरती पथके, २२ स्थिर सर्वेक्षण पथके तसेच वेब कास्टिंग चे नियोजन करण्यात आले आहे. राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार अकोला महानगरपालिका निवडणुक प्रकिया करिता प्रशासकीय यंत्रणा सज्ज झाली आहे. आज अकोला महानगरपालिका हद्दीतील पाचही झोन मधून मतदानाचे साहित्य ईव्हीएम मशीन मतदान केंद्रावर रवाना करण्यात. या प्रक्रियेसाठी २४ तास आदर्श आचारसंहिता कक्ष कार्यरत ठेवण्यात आले आहे मतदान केंद्रावर ईव्हीएम तसेच इतर मतदार साहित्य घेण्याकरिता कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.



आज महानगरपालिका हद्दीतील पाचही झोन मधून एकूण २२१ वाहनांमधून ईव्हीएम तसेच मतदानाचे साहित्य कर्मचारी घेऊन जात असून त्यांच्यासोबत पोलीस विभागाच्या कर्मचाऱ्यांची सुद्धा नियुक्ती करण्यात आली आहे. या संपूर्ण प्रक्रियेचा आढावा घेतला आहे आमचे प्रतिनिधी सुरेश राठोड यांनी माहिती दिली.

# जुन्या वैमनस्याचा हिंसक उद्रेक; चाकूहल्ल्यात दोघे जखमी

## शेलू वेताळ येथे सायंकाळी थरार, भांडण सोडविणारा युवकही रक्तबंबाळ

**मुर्तिजापुर** : जुन्या वादाचा राग मनात धरत चौघांनी संगनमताने चाकूहल्ला केल्याची गंभीर घटना ११ जानेवारी रोजी सायंकाळच्या सुमारास शेलू वेताळ येथील शासकीय निवासी शाळेजवळ घडली. या हल्ल्यात दोघे युवक जखमी झाले असून, या प्रकरणी मूर्तिजापूर ग्रामीण पोलीस ठाण्यात चार आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.समीर जाधव (रा. अनभोरा) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, त्यांचा मित्र आशिष देशमुख (रा. कंझरा) याच्यासोबत आरोपींनी जुन्या वादावरून वाद घातला. वादाचे रूपांतर अचानक हिंसाचारात झाले. आरोपींनी संगनमत करत आशिष देशमुख यांच्या गालावर चाकूने वार करून गंभीर जखमी केले. ही भांडण सोडविण्यासाठी फिर्यादी समीर जाधव पुढे गेले असता, आरोपींनी त्यांच्यावरही हल्ला चढवला. समीर जाधव यांच्या मांडीवर चाकूने वार करून त्यांनाही जखमी करण्यात आले. घटनेनंतर परिसरात एकच खळबळ उडाली.या प्रकरणातील आरोपी मुसेफ हुसेन, सुजल जाधव, प्रतिक खंडारे (सर्व रा. मूर्तिजापूर) व सुमित शेरेकर (रा. कंझरा) हे घटनास्थळावरून पसार झाले असून, ग्रामीण पोलिसांकडून त्यांचा कसून शोध सुरू आहे.

# अडगांव बु.ग्रामपंचायतीची गंगाजळी भरली ३२ लाखांची विक्रमी कर वसुली

अडगांव,दि.१४ (प्रतिनिधी)■
महाराष्ट्र शासनाच्या 'मुख्यमंत्री ग्राम समृद्धी पंचायतराज अभियाना' अंतर्गत अडगांव बु. ग्रामपंचायतीने थकबाकीदारांसाठी राबवलेली ५०% कर सवलत योजना मैलाचा दगड ठरली आहे. या योजनेचा फायदा घेत गावकऱ्यांनी आपल्या कर्तव्याची जाणीव ठेवत महिनाभरात तब्बल ३२ लाख ५० हजार ७५१ रुपयांचा कर भरणा केला आहे. यामुळे ग्रामपंचायतीची गंगाजळी फुल्ल झाली असून या निर्णयामुळे सर्व सामान्य कर धारकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

अनेक वर्षांपासून घरपट्टी आणि पाणीपट्टीची थकबाकी असल्याने ग्रामस्थांवर कराचा मोठा बोजा होता. महिनाभराच्या कालावधीत सामान्य कर एकुन ११ लाख ८८ हजार ३४५ रुपये जमा झाला तर पाणीपट्टी कर एकूण २० लाख ६२ हजार ४०६ रुपये कर जमा झाला असा एकुण ३२ लाख ५० हजार ७५१ रुपयाचा विक्रमी कर जमा झाला आहे. उल्लेखनीय बाब म्हणजे ३१ डीसेबंर ला शेवटच्या

## शेवटच्या एकाच दिवशी ५ लाख ६१ हजार ८२४ जमा

दिवशी ५ लाख ६१ हजार ८२४ रुपयाची विक्रमी वसुली झाली आहे. ग्रामपंचायतीच्या इतिहासातील ही एक विक्रमी वसुली मानली जात आहे.मिळालेल्या या भरघोस प्रतिसादामुळे ग्रामपंचायतीचे उत्पन्न वाढले आहे. या जमा झालेल्या निधीचा विनियोग गावातील रस्ते, स्वच्छता, पाणीपुरवठा आणि इतर पायाभूत सुविधांसाठी प्रभावीपणे केला जाणार असल्याचे ग्रामपंचायत प्रशासनाकडून सांगण्यात आले.या योजनेला यशस्वी करण्यासाठी सरपंच सौ. शोभाताई खंडारे,उपसरपंच मझहर अली मिरसाहेब, गटनेता संजय राजनकार, ग्रामसेवक खुमकर, ग्रा.पं.सदस्य ,कर्मचारी राजकुमार कौठकार, शे.जमीर, दिपक मानकर, श्रीकृष्ण चतुरकार, शिवकुमार मुरकर आदिनी प्रयत्न केले.

### नायलॉन मांजा विकणाऱ्यां तीन आरोपींविरुद्ध गुन्हे दाखल

**मूर्तिजापूर** : मकरसंक्रांतीच्या पार्श्वभूमीवर शहरात जीवघेण्या नायलॉन आणि चायनीज मांजाची विक्री करणाऱ्यांविरुद्ध मूर्तीजापूर शहर पोलिसांनी कडक पाऊले उचलली आहेत.

# देऊळगाव येथील शेतकऱ्याची गाय चोरट्यांनी केली लपास

पातुर,दि.१४ (प्रतिनिधी)■

**–शेतकरी झोपेत असताना दोर कापून गाय कार मध्ये टाकून नेली**
**–शेतकऱ्यांच्या तक्रारीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध पुन्हा दाखल**
**–चोरट्यांना पोलिसांचा धाकच उरला नाही**

पातुर तालुका प्रतिनिधी पातुर पोलीस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या तालुक्यातील देऊळगाव येथील शेत शिवारातून गिर जातीची गाय किंमत पंचवीस हजार रुपये दिनांक १३ जानेवारी २०२६ ला रात्री दरम्यान चोरून नेल्याची घटना घडली शेतकऱ्यांच्या तक्रारीवरून पातुर पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरुद्ध अपराध क्रमांक २४/२६कलम बी एन एस ३०३ नुसार गुन्हा दाखल केला आहे सविस्तर वृत्त असे आहे की पातुर बाळापूर महामार्गालगत शिवहरी बदरखे यांचे शेत असून शेतामध्ये दोन गाई बांधलेल्या होत्या.

त्यामधीलगीर जातीची गाय चोरट्यांनी चार चाकी वाहन त्यांच्या शेतात नेऊन बांधलेल्या गाईचा दोर कापूनगाय गाडीतजबरीने टाकली गाय य हंबरल्यामुळे शेतकऱ्याला जाग आली




असता बॅटरी लावून पाहिले असता गाय गाडीमध्ये टाकून चोरट्यांनी पोवारा केला पातुर शहरांमध्ये कत्तल करून व गोवंशाच्या मासाची विक्री होत असताना याकडे पोलीस प्रशासनाने दुर्लक्ष केले असून गोवंश चोरीचे रॅकेट सुद्धा सक्रिय झाले असून रात्री दरम्यान शेतकऱ्यांच्या गोवंशाची चोरी करून चार चाकी वाहनांतुन वाहतूक होतं आहे कत्तल करून गोवंशाचे मास दिवस निघायचे आत त्यांचे मास अकोला येथे वाहतूक करून दररोज जात असल्याचे शेतकरी बोलून दाखवत आहे मात्र याकडे पोलीस प्रशासन आणि स्थानिक गुन्हे शाखा अकोला यांचे सातत्याने दुर्लक्ष होत असल्यामुळे अकोला जिल्हा पोलीस अधीक्षक पातुर शहरातील गोवंशाची कत्तल व चोरीच्या मासाची तस्करी आणि विक्री यावर अंकुश लावावा अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.

# लाडक्या बहिणीचे दोन हप्त्याचे पैसे देण्यात येऊ नये

पातूर: लाडक्या बहिणींना डिसेंबर २०२५ आणि जानेवारी २०२६ चा हप्ता देऊ नये असे पत्र निवडणूक आयोगाला काँग्रेसच्या वतीने १० जानेवारी रोजी देण्यात आले होते .या पत्राच्या निषेधार्थ आज भारतीय जनता पार्टी पातुर तालुका ग्रामीण व शहर यांच्या वतीने काँग्रेसच्या पत्रकाची सोमवारी जाळून होळी करण्यात आली .यावेळी भारतीय जनता पार्टीचे तालुक्यातील भाजपाचे पदाधिकारी

## निषेधार्थ भाजपच्या वतीने पातूरात काँग्रेसच्या पत्राची जाळून होळी!

व कार्यकर्ते उपस्थित होते.भारतीय जनता पार्टी पातूर शहर व तालुक्याच्या वतीने १२ जानेवारी २०२६ रोजी छत्रपती संभाजी महाराज चौकात काँग्रेसने लाडक्या बहिणींचा हप्ता देण्यात येऊ नये या विरोधात भाजपाच्या पदाधिकाऱ्यांनी हे पत्रक जाळून सकाळी ११ वाजता होळी करीत निषेध व्यक्त करण्यात आला आहे. यावेळी भारतीय जनता पार्टीचे शहर व तालुक्यातील भाजपाचे सर्व आघाडी व मोर्च्याचे आजी, माजी,पदाधिकारी , मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी काँग्रेसने दिलेल्या या दिलेल्या निवेदनाचे निषेधार्थ भाजपाच्या वतीने घोषणाही देण्यात आल्या.

### विधी महाविद्यालयाच्या विद्यार्थिनीचे सुयश



**अकोला** : एज्युकेशन सोसायटी अंतर्गत अकोला विधी महाविद्यालयाची एलएल.एम. ची विद्यार्थिनी कु. वैष्णवी संतोष हगवणे हिने क्रीडा व युवक संचालनालय महाराष्ट्र राज्य अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व जिल्हा क्रीडा परिषद पुणे येथे झालेल्या राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत उत्स्फुर्त सहभाग घेऊन उल्लेखनीय यश संपादन केले आहे. ह्या स्पर्धेत तिने तृतीय क्रमांक पटकविल्यामुळे तिच्या यशाने महाविद्यालयाच्या लौकिकात भर पडली आहे.

अकोला एज्युकेशन सोसायटी चे अध्यक्ष. ॲड. राजेश्वर देशपांडे, वरिष्ठ उपाध्यक्ष प्रा. डॉ. विजय दिगंबर नानोटी, कनिष्ठ उपाध्यक्ष श्री किशोर रामचंद्र जोशी, कनिष्ठ उपाध्यक्ष डॉ. सहदेव पांडुरंग रोठे, सचिव श्री. शार्दुल दिगंबर, कार्यकारिणी सदस्य श्री जयंत सुर्यकांत पडगिलवार तसचे,अकोला विधी महाविद्यालयाचे संस्थापक डॉ. एस.सी. भंडारी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सीमा शिरसाट व महाविद्यालयाचे शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचार्यांनी तिचे कौतुक करून तिला पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# अकोला रायफल क्लबच्या शूटर्सची राष्ट्रीय स्तरावर ३ सुवर्ण १ रौप्य पदक कामगिरी

अकोला,दि.१४ (प्रतिनिधी)■
दि. ४ जानेवारी २०२६ ते ८ जानेवारी २०२६ या कालावधीत भोपाळ (मध्यप्रदेश) येथे पार पडलेल्या ६९ व्या राष्ट्रीय शालेय रायफल शूटिंग स्पर्धेत अकोला रायफल क्लबच्या खेळाडूंनी आपल्या उत्कृष्ट नेमबाजी कौशल्याने देशभरात अकोल्याचा नावलौकिक वाढवला आहे.

देशातील विविध राज्यांतून आलेल्या हजारो गुणवान नेमबाजांमध्ये अकोल्याच्या खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी करत सुवर्ण व रौप्य पदकांवर आपले नाव कोरले.या स्पर्धेत आदित्य अनंत शेळके याने वैयक्तिक प्रकारात सुवर्ण पदक पटकावत संपूर्ण भारतात प्रथम क्रमांक मिळवला. त्याची ही कामगिरी अत्यंत प्रेरणादायी असून त्याने आपल्या अचूक नेमबाजीने प्रेक्षक व परीक्षकांची मने



जिंकली. यासोबतच टीम महाराष्ट्र कडून सहभागी होत त्याने रौप्य पदक मिळवून संघाच्या यशातही मोलाचा वाटा उचलला. आदित्यची मेहनत, सातत्य, आत्मविश्वास आणि स्पर्धात्मक मानसिकता याचे हे उज्ज्वल फळ आहे.तसेच अकोला रायफल क्लबचीच आणखी एक गुणवंत खेळाडू राजविद्या घोडे हिने टीम महाराष्ट्र कडून खेळताना सुवर्ण पदक पटकावून अकोल्याच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला. तिच्या या यशामुळे महिला नेमबाजांसाठी नवा आदर्श निर्माण झाला असून भविष्यातील खेळाडूंना ती प्रेरणास्थान ठरणार आहे.या सर्व यशामागे मार्गदर्शक श्री. विन्सेंट अमेर सर यांचे मोलाचे मार्गदर्शन, काटेकोर सराव पद्धती, शिस्तबद्ध प्रशिक्षण आणि खेळाडूंवर असलेला विश्वास कारणीभूत ठरला आहे. त्यांच्या तांत्रिक मार्गदर्शनामुळे आणि प्रेरणादायी नेतृत्वा मुळे अकोला रायफल क्लब आज राष्ट्रीय पातळीवर आपली ठळक ओळख निर्माण करत आहे.

# प्रतिभा पाथ्रीकर राजमाता जिजाऊ पुरस्काराने सन्मानित



राजमाता जिजाऊ यांचे जयंती निमित्ताने आयोजित भव्य समारंभात अखिल भारतीय मराठा सेवा संघा तर्फे त्यांच्या सामाजिक, सांस्कृतिक, साहित्यिक, कार्याची दखल घेऊन राजमाता जिजाऊ पुरस्काराने सन्मानित करण्यात. शाल, श्रीफळ, सन्मान पत्र, सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. ह. भ. प. वासुदेव महाराज महल्ले यांचे शुभ हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. या वेळी ह भ प डॉ. शंकर बोर्डे,डॉ. प्रा. ममता इंगोले (महल्ले) व अनेक मान्यउपस्थित होते.कार्यक्रमाचे संचालक व आभार प्रदर्शन गजानन हरणे यांनी केले. कार्यक्रमाचे सफलते साठी प्रा. दादाराव पाथ्रीकर, मोरे महाराज, सौ. हरणे यांनी प्रयत्न केलेत.

# डॉ.हेडगेवार यांनी दिलेल्या शाखा तंत्रातून सर्वस्वाचे समर्पण देणारे कार्यकर्ते घडले

## विभाग संघचालक नरेंद्रजी देशपांडे यांचे प्रतिपादन



■तेल्हारा,दि.१४ (प्रतिनिधी)■
सर्वदूर संस्कृती, धर्म विचारांचा ऱ्हास होत असल्याचे चित्र सर्वत्र दिसून येत आहे. परिस्थिती हाताबाहेर जातआहे.मोबाईलपायी मानसिक संतुलन बिघडले आहे, समाजात फूट पाडणारे विचार घराघरात घडत आहेत. अशा परिस्थितीत समाज प्रबोधन, वाचन संस्कृती वाढणे गरजेचे असून नव्या पिढीने हे जाणले पाहिजे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे आद्य सरसंघचालक केशव बळीरामपंत हेडगेवार यांनी सर्वस्वाचे समर्पण देणारी माणसे शाखा तंत्रातून निर्माण केली. असे प्रतिपादन तेल्हारा येथे शनिवार दि.१० जानेवारी २०२६ रोजी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ अकोला विभाग प्रचार विभागाच्या वतीने आयोजित मासिक जागरण पत्रिका 'विदर्भ हुंकार' च्या शताब्दी वर्ष विशेषांक समर्पणाचा शतकोत्सव या विशेषांकाचे प्रकाशन समारंभात प्रमुख वक्ते म्हणून बोलताना केले. आपल्या प्रमुख उदबोधनातून त्यांनी पंचपरिवर्तन (कुटुंब प्रबोधन, सामाजिक समरसता, पर्यावरण संरक्षण, स्व आधारित जीवन, नागरी शिष्टाचार) या गोष्टी आचरण आज आणण्याची गरज प्रतिपादन केली.तेल्हारा येथील भागवत मंगल कार्यालयात आयोजित प्रकाशन समारंभास प्रमुख अतिथी म्हणून डॉ. गोपाळराव खेडकर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ गोपाल ढोले, प्रमुख वक्ते आदि उपस्थित होते.

### पद्मविभूषण डॉ. मोहन धारिया जन्मशताब्दी निमित्त वनराई चित्रकला स्पर्धेचे आयोजन

अकोला,दि.१४ (प्रतिनिधी)■
माजी केंद्रीय मंत्री, स्वतंत्रता सेनानी, पद्मविभूषण डॉक्टर मोहन धारीया जन्मशताब्दी निमित्त रविवार दिनांक १८जानेवारी २०२६ ला राज्यस्तरीय वनराई बालकुमार साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांमधील सुप्त कलागुणांना उत्तेजन देण्यासाठी व सर्जनशीलतेला विचारपीठ मिळावे आणि पर्यावरण जाणीव जागृती साठी वनराई चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.ही स्पर्धा शालेय स्तरावर दि. १६ व १७ जानेवारी ला शालेय स्तरावर घेण्यात येईल. स्पर्धेतील विजेत्यांना वनराई करंडक व स्मृतीचिन्ह देवून सन्मानीत करण्यात येईल.या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येत सहभाग घेण्याचे आवाहन संमेलनाचे संयोजक बबनराव कानकिरड, गजानन चौधरी व स्पर्धा प्रमुख ज्ञानेश्वर मांडेकर, प्रमोद देहनकर यांनी केले आहे.

# तीन मुक्तांची आई आदिशक्ती मुक्ताई : श्री ज्ञानेश्वर महाराज वाघ

अकोला,दि.१४ (प्रतिनिधी)■
वारकरी संप्रदायाच्या संत कृपा रुपी इमारतीच्या पायामध्ये विठ्ठलपंत आणि रुक्मिणी देवी यांच्या बलिदाना नंतर आळंदी स्थित सिद्ध बेटातील गवताच्या कुटीत निवृत्तीनाथ , ज्ञानोबाराय, आणि सोपान काका या तीन ज्येष्ठ भावंडांसोबत राहत असतांना त्यांनी भिक्षा मागून आणलेल्या कोरांन्नाचे मिष्ठांन्न बनवून देत या तिघांची लाडकी लडिवाळ मुक्ता हे मुक्ताबाई व लवकरच या तिन्ही मुक्तांची आई मुक्ताई कधी झाली हे कळले सुद्धा नाही. अर्थातच नात्याने बहीण असलेली आदिशक्ती मुक्ताई हे तीन मुक्तांची आई झाल्याचे गौरवोद्गार भागवताचार्य ज्ञानेश्वर महाराज वाघ यांनी काढले. ते आज स्थानिक जिल्हा परिषद नगर खडकी परिसरातील हनुमान मंदिरात ग्रंथराज ज्ञानेश्वरीचे उपासक असणारे श्रीयुत भानुदास महाराज सखाराम पुरकर यांच्या मुखारविंदातून संपन्न होत असणाऱ्या भावकथा निरूपण सप्ताहातील कीर्तनप्रसंगी बोलत होते. ते पुढे म्हणाले की , ब्रह्मा ,विष्णू , महेश हे त्रिदेव जेव्हा निवृत्ती



, ज्ञानदेव ,सोपान या संतत्रयांच्या रूपाने या अवनीतलावर अवतीर्ण होण्याकरिता उद्युक्त झाले असतांना आदिशक्ती योगमायेनी सुद्धा त्यांच्यासोबत अवतरित होण्याचा आग्रह धरला . तेव्हा त्या त्रिदेवांनी तिला सांगितले की, तुला जर आम्ही सोबत घेतले तर , हे योगमाये ! तु तुझ्या स्वभावात प्रमाणे मयेचा पडदा टाकून आमच्या जगदोद्धाराच्या कार्यास आच्छादित करून टाकशील. तेव्हा तिने सांगितले की , मी तुमच्या कार्यास कुठल्याही पद्धतीचा प्रतिबंध निर्माण न करता तुम्हा तिघांसोबत येऊन, लाडक्या बहीणीच्या रूपाने तुमची पाठ राखण करेल , मानसकन्या होऊन तुमच्या ठिकाणी जगदोद्धाराची प्रेरणा निर्माण करेल तसेच प्रसंगी तुम्हा तिघांची आई होऊन अधिकार वाणीने उपदेशही करेल. म्हणूनच संत रूपाने अवतरीत झालेल्या योगमाया मुक्ताईने एकटीनेच उपरोक्त तिन्ही भूमिका अगदी योग्य पद्धतीने कशावर वठवील्या याचे सप्रमाण ,सखोल व चिंतनात्मक विश्लेषण महाराजांनी ताटी उघडा ज्ञानेश्वरा या अभंगाच्या माध्यमातून करून उपस्थितांना मकर संक्रांतीच्या पूर्वसंध्येला अगदी नवीन विषयाची पर्वणी प्राप्त करून देत मंत्रमुग्ध केले

MAHAGENCO
Maharashtra State Power Generation Co. Ltd.

**e-Tender-Notice**

Online tenders are invited in two bids at O/o The Chief Engineer (Project), MSPGCL, Koradi.
Email id: etenderingkrdproj@mahagenco.in
Sale of Bid document: From 14/01/2026 to 22/01/2026 @1100 Hrs.
Last date of submission of Bid: 22/01/2026 @1500 Hrs.
Cost of above Tender will be Rs. 1,180/-.

| Sr. No | e-Tender No | Subject | EMD/Estimated Value (In Rs.) |
|---|---|---|---|
| 1 | RFx-3000064928 | Hiring of Dozer BD155 or equivalent along with driver and Diesel at 2x660 MW Koradi project. | 31,550/- / 28,03,284/- |

a. Further details pertaining to above tenders are available on website https://eprocurement.mahagenco.in.
b. Any amendment to this notice and /or notification of amendment in bidding document shall be notified on above website only. Potential bidders are requested to make a note of the same.

**Chief Engineer (Project),**
Koradi Project, MSPGCL, Koradi

**CHANGE IN NAME**
I Have Change My Name From-
**UJJAWALA SATISH DHUMALE**
- TO
**UJJWALA SATISH DHUMALE**
**PASSPORT NO :- S5111675**
My Residential Address is :- Ward No.3 New Tapadiya Nagar kharab road akola

# कुख्यात गुंड स्वप्नील उर्फ लाल्या अशोक पालकर एका वर्षाकरीता स्थानबद्ध

**अकोला** : अकोला शहरातील पंचशील नगर, वाशिम बायपास, जुने शहर अकोला येथे राहणारा अट्टल कुख्यात गुंड स्वप्नील उर्फ लाल्या अशोक पालकर, वय ३५ वर्ष वर्ष, याचे वर यापुर्वी खुनाचा प्रयत्न करणे, बलात्कार, जबरी चोरी करतांना इच्छापुर्वक दुखापत करणे, जबरी चोरी करणे, एखाद्या व्यक्तीस मृत्यु किंवा जबर दुखापत याची भिती घालुन बलाद्रहण करणे, दुखापत, हमला किंवा गैर निरोध करण्याची पुर्व तयार करून गृह अतिक्रमण करणे, घातक हत्यारांनी किंवा साधनांनी इच्छापुर्वक दुखापत पोहचविणे, लोकसेवकाला त्याचे कर्तव्य पार पाडण्यापासुन धाकाने परावृत्त करण्यासाठी हमला किंवा फौजदारी पात्र बलप्रयोग करणे, बलाद्रहण करणे, नुकसान करून आगळीक करणे, प्राण घातक हत्यारानिशी सज्ज होवुन गैरकायदयाची मंडळी जमवणे व दंगा करून गंभीर दुखापत करणे, शांतता भंग घडवुन आण्याच्या उद्देशाने अपमान करणे, फौजदारीपात्र धाकदपटशा करणे, बेकायदेशीररित्या शस्त्र बाळगणे, प्रतिबंधात्मक आदेशाचे उल्लंघन करणे, सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करणे, लोकसेवकाचा अंगावर जावुन किंवा बलप्रयोग करून सरकारी कामात अडथळा निर्माण करणे, महीलांचा विनयभंग करणे इ. असे बरेच गंभीर गुन्हे दाखल आहेत.

RNI NO-46973/1986 Mahasagar Akola
Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak. Printed at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Kamala Square, Durga Chowk, Akola. Group Editor-in-Chief and Managing Director - Shrikrishna Tansukhdas Chandak, Group Editor - Sandeep Ramrao Kale, Managing Editor - Pankaj Shrikrishna Chandak. Local Editor Purushottam Madhukarrao Dhole Phone 9881489479 (Responsible for editorial as per PRB act). Head Office Phone 7447735851,9922970023

आर.एन.आय. नोंदणी क्रमांक ४६९७३/१९८६ महासागर अकोला
मालक, मुद्रक, प्रकाशक : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, मिला स्केअर, दुर्गा चौक, अकोला, येथे प्रकाशित केले. मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक
स्थानिक संपादक : *पुरूषोत्तम मधुकरराव ढोले, फोन : ९८८१४८९४७९* (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी स्थानिक संपादकांची राहील )

# : रोमियो-ज्युलिएट कायदा : संरक्षणाच्या नावाखाली अतिरेक की गैरवापरावर लगाम?

बालकांचे संरक्षण हा पोक्सो कायद्याचा गाभा असला, तरी त्याच कायद्याचा वापर काही वेळा तरुणांचे आयुष्य उद्ध्वस्त करण्यासाठी होत असल्याचे वास्तव आता न्यायालयीन नोंदींमध्येही स्पष्ट झाले आहे. परस्पर संमतीने नात्यात असलेल्या किशोरवयीन तरुणांवर लैंगिक गुन्ह्यांचे खटले दाखल होण्याचे वाढते प्रमाण हे केवळ सामाजिक तणावाचे नव्हे, तर कायद्याच्या अतिरेकाचेही लक्षण आहे. याच पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयाने रोमियो-ज्युलिएट कायद्याचा विचार करण्याची सूचना करत, संरक्षण आणि अन्याय यांमधील समतोलाचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आणला आहे.

---



ॲड. दत्तात्रय फडतरे
पुणे. 7588072685

किशोरवयीन मुलांचे लैंगिक गुन्ह्यांपासून संरक्षण करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या पोक्सो गैरवापराची सर्वोच्च न्यायालयाने दखल घेतली आहे. न्यायालयाने केंद्र सरकारला या समस्येला आळा घालण्यासाठी रोमियो-ज्युलियट कलम आणण्याचा विचार करण्यास सांगितले. जेणेकरून अजाणतेपणाने परस्पर संमतीने संबंध करणाऱ्या मुलांना वाचवता येऊ शकेल.

न्या. संजय करोल आणि एन. कोटिश्वर सिंह यांच्या खंडपीठाने म्हटले की, पोक्सोसारख्या कायद्याचा व्यापक गैरवापर रोखण्यासाठी रोमियो-ज्युलियट कलम लागू करणे आवश्यक असल्याचे म्हटले आहे. उत्तर प्रदेशातील अल्पवयीन मुलीशी संबंधित लैंगिक अत्याचार प्रकरणात एका आरोपीला जामीन देण्याच्या अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या आदेशाला राज्य सरकारकडून सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले आहे.

त्यावरच्या सुनावणीच्या वेळी सर्वोच्च न्यायालयाने ही टिप्पणी केली. उच्च न्यायालयाचा आदेश चुकीचा असल्याचे सर्वोच्च न्यायालयालाही आढळले; परंतु आरोपीला देण्यात आलेला जामीन त्यांनी कायम ठेवला.

या कायद्याच्या गैरवापराची न्यायालयाने दखल घेतली आहे म्हणून या निर्णयाची एक प्रत भारत सरकारच्या कायदा सचिवांना पाठवावी जेणेकरून ते या समस्येला आळा घालण्यासाठी आवश्यक पावले उचलण्याचा विचार करू शकतील.

यामध्ये इतर गोष्टींबरोबरच, या कायद्याच्या कक्षेतून खऱ्या अल्पवयीन संबंधांना वगळणारा रोमियो-ज्युलियट कलम समाविष्ट करणे आणि याचा गैरवापर करून सूड उगवणाऱ्यांवर खटला चालवण्यासाठी एक व्यवस्था स्थापन करण्याची गरज निर्माण झाली आहे.

सर्वोच्च न्यायालयाने सुचवलेल्या रोमियो - ज्युलियट कलमाचा उद्देश खऱ्या अल्पवयीन संबंधांना पोक्सोच्या कठोर तरतुदींमधून वगळणे आहे. अनेकदा जेव्हा कुटुंबे किशोरवयीन मुलांमधील संमतीने झालेल्या संबंधांना आक्षेप घेतात, तेव्हा मुलाविरुद्ध पोक्सोअंतर्गत खटला दाखल केला जातो.

पोक्सोमध्ये संमती हा घटक नसल्यामुळे, आरोपी अल्पवयीन असूनही त्याला कठोर शिक्षा भोगावी लागते. म्हणून, सर्वोच्च न्यायालयाचे असे मत आहे की असे कायदे आणले पाहिजेत जे कोणते खटले चुकीचे आहेत आणि कोणते प्रत्यक्षात गुन्हे आहेत हे ओळखू शकतील.

रोमियो-ज्युलिएट कायद्याचा युक्तिवाद असा मांडला जातो की वयातील किरकोळ फरक आणि परस्पर संमती असलेल्या नात्यांना गुन्हेगारी चौकटीबाहेर ठेवले पाहिजे. तरुणांच्या भावनिक वास्तवाला कायदेशीर मान्यता देण्याचा हा प्रयत्न असल्याचे समर्थक सांगतात.

अल्पवयीनांवरील लैंगिक अत्याचार रोखण्यासाठी लागू केलेला पॉक्सो कायदा आज काही प्रकरणांत परस्पर संमतीने असलेल्या तरुणांच्या नात्यांवरही कठोरपणे लागू होत आहे. याच पार्श्वभूमीवर रोमियोझ्ज्युलिएट कायदा लागू करण्याची मागणी पुढे येत आहे.

१६ ते १८ वयोगटातील अनेक तरुण-तरुणी परस्पर संमतीने नात्यात असतात. मात्र सामाजिक दबाव, पालकांचा विरोध किंवा कौटुंबिक प्रतिष्ठेच्या मुद्द्यांमुळे अशा नात्यांना कायदेशीर गुन्ह्याचे स्वरूप दिले जाते. परिणामी, तरुण मुलांवर गंभीर गुन्हे दाखल होतात आणि त्यांचे शिक्षण व करिअर धोक्यात येते.

या परिस्थितीत रोमियो-ज्युलिएट कायदा हा एक व्यवहार्य उपाय असल्याचे समर्थकांचे म्हणणे आहे. वयातील मर्यादित फरक आणि परस्पर संमती लक्षात घेऊन अशा नात्यांना गुन्हेगारी चौकटीबाहेर ठेवावे, असा युक्तिवाद मांडला जातो. यामुळे कायद्याचा अनावश्यक गैरवापर टाळता येईल, असेही सांगितले जाते.

वयातील मर्यादित फरक असलेल्या तरुणांमधील परस्पर संमतीने झालेले संबंध गुन्हा मानले जाऊ नयेत, असा या मागणीचा गाभा आहे. या तरतुदीमुळे प्रेमसंबंध आणि शोषण यामधील फरक अधोरेखित करता येईल, असा युक्तिवाद केला जातो.

देशातील सध्याचे सामाजिक वास्तव पाहता हा कायदा धोकादायक ठरू शकतो. संमती हा शब्द कागदावर जितका सोपा, प्रत्यक्षात तितकाच गुंतागुंतीचा आहे. दबाव, फसवणूक किंवा भावनिक गुंतवणूक यामध्ये अडकलेल्या अल्पवयीन मुली खरोखरच स्वतंत्र निर्णय घेतात का, हा प्रश्न कायम राहतो. अशा परिस्थितीत रोमियो-ज्युलिएट कायदा शोषकांसाठी कवच ठरू नये, ही भीती रास्त आहे. पॉक्सो कायद्याची धार बोथट झाली, तर त्याचा फटका थेट मुलींच्या सुरक्षिततेला बसू शकतो.

म्हणूनच या विषयावर भावनिक घोषणांपेक्षा व्यवहार्य उपायांची गरज आहे. रोमियोझ्ज्युलिएट कायदा लागू झाल्यास त्याचा गैरवापर होण्याची शक्यता नाकारता येत नाही. शोषणाच्या प्रकरणांमध्ये आरोपी या तरतुदीचा आधार घेऊन शिक्षा टाळण्याचा प्रयत्न करू शकतात. त्यामुळे बालकांच्या संरक्षणासाठी अस्तित्वात असलेल्या कायद्यांची धार बोथट होण्याची भीती आहे.

सरसकट कायदेबदल करण्याऐवजी, न्यायालयांना प्रकरणनिहाय विवेकाधिकार, स्पष्ट मार्गदर्शक तत्त्वे आणि समतोल शिक्षा ठरवण्याची मुभा देणे तसेच समूपदेशनासारख्या पर्यायांचा वापर करणे हा अधिक सुरक्षित मार्ग ठरू शकतो.

प्रेम आणि संरक्षण यामधील सीमारेषा आखणे सोपे नाही. मात्र प्रेमाच्या नावाखाली अन्याय होऊ नये आणि संरक्षणाच्या नावाखाली तरुणांचे आयुष्य उद्ध्वस्त होऊ नये, हाच या चर्चेचा खरा गाभा आहे. ह्यसंमतीह्व हा शब्द अनेकदा दबाव, भीती किंवा फसवणुकीखाली वापरला जाऊ शकतो.

याशिवाय, पॉक्सो कायद्याचा मूळ उद्देश – बालकांचे संरक्षण – दुर्बल होऊ नये, ही राज्याची जबाबदारी आहे. शोषण करणारे आरोपी परस्पर संमतीचा आधार घेऊन शिक्षा टाळू लागले, तर त्याचा फटका थेट पीडितांनाच बसेल.

तरुणांच्या स्वातंत्र्याचे संरक्षण आणि बालकांच्या सुरक्षिततेतील समतोल राखणे हीच खरी कसोटी आहे. रोमियोझ्ज्युलिएट कायदा हा एक सोपा उपाय नसून, तो लागू करण्याआधी व्यापक समाजचर्चा आणि काळजीपूर्वक कायदेबदल अपरिहार्य ठरतात.

तरुणांच्या भावनिक वास्तवाकडे डोळेझाक करता येणार नाही; मात्र बालकांच्या सुरक्षिततेशी कोणतीही तडजोडही करता येणार नाही. रोमियो-ज्युलिएट कायदा हा या द्वंद्वाचा सोपा उपाय नसून, त्यावर अधिक व्यापकपणे विचारमंथन होणे तितकेच गरजेचे आहे.

---

(लेखक पुणे येथे वकील असून चालु घडामोडींचे अभ्यासक आहेत.)

# भारत - अमेरिका टॅरिफ युद्ध जागतिक राजकारणातील नवी दिशा



प्रा. डॉ. सतीश रामदास महल्ले
9923572226

सध्या भारत-अमेरिका व्यापार संबंधात टॅरिफचा मुद्दा चर्चेचा केंद्रबिंदू बनला आहे. हे देश जागतिक राजकारणातील महत्त्वाचे भागीदार मानले जातात. संरक्षण, तंत्रज्ञान, ऊर्जा आणि इंडो-पॅसिफिक धोरणात दोन्ही देशांमध्ये वाढते सहकार्य दिसून येत असताना टॅरिफ (आयात-निर्यात शुल्क) या मुद्द्यावरून अधूनमधून निर्माण होणारा तणाव चिंतेचा विषय ठरत आहे. यावेळी, ५०% ते ५००% टॅरिफचा मुद्दा हे केवळ आर्थिक नाही तर राजकीय आणि आंतरराष्ट्रीय संबंधांचा विषय देखील बनला आहे. ज्यामुळे निर्यातदारांना मोठे आव्हान निर्माण झाले आहे.

अमेरिकेच्या मते, भारत रशियाकडून तेलाची खरेदी करतो, हे पैसे रशिया युक्रेन युद्धामध्ये फंडिंगच्या स्वरुपात वापरले जातात तसेच भारत काही उत्पादनांवर जास्त आयात शुल्क लावतो.

विशेषतः कृषी उत्पादने, दुचाकी-चारचाकी वाहने, इलेक्ट्रॉनिक्स आणि मद्य यांवर. त्यामुळे अमेरिकन कंपन्यांना भारतीय बाजारात स्पर्धा करताना अडचणी येतात. त्यामुळे आपण भारतावर ५० टक्के टॅरिफ लावला असल्याचं अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटले आहे. तर दुसरीकडे ट्रम्प यांच्याकडून ल1-इ व्हिसाच्या शुल्कामध्ये देखील मोठी वाढ करण्यात आली आहे. याचा देखील मोठा फटका हा भारताला बसताना दिसून येत आहे.

आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये भारताची अमेरिकेला निर्यात सुमारे ८५-९० अब्ज डॉलर होती, तर अमेरिकेची भारताला निर्यात सुमारे ४५-५० अब्ज डॉलर होती. टॅरिफ ५०% पर्यंत वाढवल्या गेल्या मुळे अंदाजे भारताच्या निर्यातीत २०-३०% घट होऊन १५-२५ अब्ज डॉलर नुकसान भारताला होत आहे.

दुसरीकडे, भारताचे म्हणणे आहे की, आपल्या राष्ट्रीय हितासाठी शेतकरी, मत्स्यपालक, दुग्ध उत्पादक आणि लघु-मध्यम उद्योगांचे संरक्षण करण्यास भारत नेहमीच कटिबद्ध राहील. मोदींनी सांगितले की देशाच्या हितासाठी आणि भारतीय अर्थव्यवस्थेच्या रक्षणासाठी कोणतीही किंमत मोजण्याची तयारी भारताची आहे.

अमेरिकेच्या टॅरिफमुळे निर्माण झालेल्या ताणाला तोंड देण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी आत्मनिर्भर भारत व वोकल फॉर लोकल या धोरणांवर जोर दिला आहे. त्यांनी नागरिकांना घरेलू उत्पादन खरेदी करण्याचे आवाहन केले आणि स्थानिक उद्योगांना प्रोत्साहन देणे आवश्यक असल्याचे स्पष्ट केले आहे.

हे धोरण केवळ टॅरिफचा परिणाम कमी करण्यासाठी नाही. तर भारताची आर्थिक स्वावलंबन क्षमता वाढवण्यासाठी महत्त्वाचे आहे. त्यामुळे अमेरिकेच्या टॅरिफ मुळे भारताच्या दीर्घकालीन विकासावर परिणाम होणार नाही. या परिस्थितीत अमेरिकेशी तणाव असूनही भारताने द्विपक्षीय व्यापार चर्चा आणि नेतृत्व स्तरावर संवाद चालू ठेवण्यावर भर दिला आहे. ज्यामुळे द्विपक्षीय संबंध टिकवण्याची शक्यता कायम आहे.

राजकीय व कूटनीतिक स्तरावर भारत आणि अमेरिका लोकशाही मूल्यांवर विश्वास ठेवतात. दहशतवादा विरोधातील लढा, हवामान बदल, आरोग्य सुरक्षा यांसारख्या जागतिक प्रश्नांवर दोन्ही देशांची भूमिका अनेकदा समान दिसते. मात्र रशियाझ्युक्रेन युद्ध, इराण किंवा मध्यपूर्वेतील संघर्ष यांसारख्या मुद्द्यांवर भारताने स्वतंत्र परराष्ट्र धोरण ठेवले आहे.

या दरम्यान अमेरिकेकडून भारतावर दबाव निर्माण करण्याची एकही संधी सोडली जात नसतानाच, रशियाकडून तेल खरेदी करणाऱ्या अशा देशांवर ५०० टक्के टॅरिफ व कठोर निर्बंध लादण्याची धमकी अमेरिका राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी नुकतीच दिली आहे.

५०० टक्के टॅरिफ बाबतचे प्रस्तावित विधेयक मंजूर झाल्यास भारतासह चीन, ब्राझीलसारख्या देशांवर रशियन तेल किंवा युरेनियम खरेदी केल्याबद्दल ५००% पर्यंत आयात शुल्क (टॅरिफ) लावण्याचा अधिकार ट्रम्प यांना मिळणार आहे. पुढील आठवड्यात सिनेटमध्ये विधेयकावर मतदान होण्याची शक्यता आहे. असे झाल्यास याचा थेट परिणाम भारतावर होऊन वॉशिंग्टन सोबतचे व्यापारसंबंध ताणले जाण्याची शक्यता आहे.

जर भविष्यात ५००% टॅरिफ लावले गेले, तर त्याचा परिणाम केवळ भारत किंवा अमेरिकेपुरता मर्यादित राहणार नाही. जागतिक पुरवठा साखळी विस्कळीत होईल, ग्राहकांवर महागाईचा बोजा वाढेल आणि आंतरराष्ट्रीय व्यापारातील विश्वासाला तडे जातील. टॅरिफ हा तात्पुरता आर्थिक उपाय असू शकतो, मात्र दीर्घकालीन दृष्टिकोनातून संवाद, व्यापार सुलभीकरण आणि धोरणात्मक समजूत हाच मार्ग आहे. म्हणूनच टॅरिफ युद्ध हे कोणत्याही देशाच्या हिताचे नाही.

# साता समुद्रांपलीकडे पोहोचलेली सामाजिकता चेतन बंडेवारांची प्रेरणादायी वाटचाल

महाराष्ट्र आणि आंध्र प्रदेशाच्या सीमेलगत वसलेलं तामसा नावाचं छोटंसं शहर. शेती हा जरी या परिसराचा श्वास असला, तरी उद्योग, व्यवहार आणि नव्या कल्पनांची बीजं इथे अनादी काळापासून रुजलेली दिसतात. याच मातीत बंडेवार कुटुंबाची पिढीजात मेहनत, उद्योगशीलता आणि बदल स्वीकारण्याची वृत्ती खोलवर रुजलेली आहे. काळाप्रमाणे बदलत जाणारं, पण मूल्यांशी कधीही तडजोड न करणारे हे कुटुंब म्हणजे तामसाच्या सामाजिक-सांस्कृतिक जडणघडणीचा एक महत्त्वाचा धागा आहे.

याच कुटुंबात चेतन बंडेवार या तरुणाचा जन्म झाला. चेतन यांचे वडील आत्माराम बंडेवार व्यवसायाच्या निमित्ताने गावाबाहेर गेले, पण जिथे गेले तिथेही त्यांनी कष्ट, प्रामाणिकपणा आणि दूरदृष्टी यांची चुणूक दाखवली. घरचं वातावरण, अनुभवांनी समृद्ध झालेली परिस्थिती आणि समाजाकडे पाहण्याची संवेदनशील दृष्टी, या सगळ्यांचा संगम चेतन बंडेवार यांच्या व्यक्तिमत्त्वात लहानपणापासून घडत गेला.

त्यामुळे त्यांनी उभं केलेलं काम केवळ नोंद घेण्याजोगंच नाही, तर पुढच्या पिढ्यांसाठी दिशादर्शक ठरणारं आहे. उद्योगाची कास धरत असताना अनेकांना आपलंसं करणं ही चेतन बंडेवार यांची सहज वृत्ती आहे.

सुरुवातीला महाराष्ट्रात आणि त्यानंतर देशातील विविध राज्यांमध्ये त्यांच्या कामाची छाप उमटत गेली. शेती, घरजमीन खरेदी-विक्रीचा व्यवसाय, प्रचंड जनसंपर्क आणि लोकांशी संवाद साधण्याची कला, या सगळ्यांत त्यांनी प्राविण्य मिळवलं. पण या यशाच्या केंद्रस्थानी केवळ नफा नव्हता; माणूस आणि माणुसकी होती.

अनाथ मुलांना मदतीचा हात, वृद्धाश्रमांना आधार, शिक्षणासाठी पुढाकार आणि सामाजिक रचनेत सतत सकारात्मक हस्तक्षेप, हे सगळं इतक्या सातत्याने आणि आत्मीयतेने करणं बंडेवार यांच्याइतकं फार थोड्यांना जमलं.

एक मूल शिकतं आणि मोठं होतं, तेव्हा केवळ त्याचं नाही तर अख्खं कुटुंब पुढे जातं, ही भावना त्यांच्या मनात ठासून भरलेली आहे. म्हणूनच शिक्षणाला त्यांनी केवळ मदतीचा विषय न मानता, सामाजिक परिवर्तनाचं प्रभावी साधन मानलं. मराठवाड्याच्या संस्काराचा चेतन बंडेवार यांच्यावर खोल प्रभाव आहे.

नांदेड या शहरातील गुरुद्वारा आणि शीख धर्मीयांच्या दानशूरतेची परंपरा त्यांच्या विचारविश्वात खोलवर रुजली आहे. सेवा हा शब्द केवळ उच्चारायचा नसून तो जगायचा असतो, ही जाणीव इथूनच अधिक पक्की झाली.

देवावर श्रद्धा ठेवणारी माणसं आपल्या देशात भरपूर आहेत; पण देवापलीकडेही एक सुंदर जग आहे, ते म्हणजे सेवाभावी वृत्तीचं. जोपर्यंत आपण समाजकार्याशी नातं जोडत नाही, तोपर्यंत आयुष्याला खरी रुची येत नाही, या भावनेतूनच चेतन बंडेवार यांनी गेल्या अनेक वर्षांपासून समाजकार्य अखंड सुरू ठेवलं आहे.







mahasagarngp@gmail.com

उद्योगात रुची असणाऱ्या तरुणांची संख्या वाढली पाहिजे, यासाठी त्यांनी स्वतंत्र उपक्रम हाती घेतले. या उपक्रमांच्या माध्यमातून अनेक तरुणांना उद्योजकतेचा मार्ग सापडला.

केवळ आर्थिक यश नव्हे, तर सामाजिक भान ठेवून उद्योग कसा उभा करायचा, याचं जिवंत उदाहरण त्यांनी दिलं.

याहीपुढे जाऊन त्यांनी एक वेगळं आणि धाडसी पाऊल उचललं. देशभरातील दानशूर कॉर्पोरेट व्यक्ती आणि संस्थांना त्यांनी एकत्र आणलं.

ज्यांना दानाची गरज आहे आणि ज्यांच्या माध्यमातून दीर्घकाळ टिकणारी, समाजोपयोगी निर्मिती होऊ शकते, अशा घटकांशी त्यांनी दात्यांचा पूल बांधला. या प्रयत्नांना प्रचंड यश मिळालं. सीएसआर फंडाच्या माध्यमातून मदत देणारे आणि मदत घेणारे, या दोघांची गरज समजून घेणारी एक मजबूत साखळी त्यांनी राज्याच्या कानाकोपऱ्यात उभी केली.

आपल्याकडे येणारा पैसा, प्रतिष्ठा मोठी असू शकते; पण त्यातून आपण एखाद्या गरिबाला किती आधार देऊ शकतो, हेच खऱ्या अर्थाने महत्त्वाचं, असं चेतन बंडेवार ठामपणे सांगतात. शाळेत जाण्यापूर्वी एखाद्या मुलाला धाडसाने उभं केलं, त्याला योग्य वेळी आर्थिक मदत दिली, तर त्याचा परिणाम केवळ त्या मुलापुरता मर्यादित राहत नाही.

त्याचं कुटुंब, घर, गाव आणि अख्खा परिसर सामाजिक व आर्थिकदृष्ट्या उजळून निघतो.

अनेक संस्था मनापासून काम करतात; पण निधीअभावी पुढे जाऊ शकत नाहीत. अशा संस्थांना आधार देणं ही आपली सगळ्यांची जबाबदारी आहे, या जाणिवेतून त्यांनी दोन घटकांवर विशेष भर दिला, गरजू विद्यार्थी आणि संघर्षरत संस्था. या वाटेवर त्यांना यश मिळालं, कारण तिथे काहीतरी चांगलं, टिकाऊ आणि अर्थपूर्ण निर्माण होत असल्याचं त्यांना स्पष्ट दिसत होतं.

आई-वडिलांनी दिलेलं एक वाक्य ते आजही जपून ठेवतात, इतरांच्या डोळ्यातले अश्रू पुसण्यासाठी तू पुढाकार घेतला पाहिजेस; तेच तुझ्या आयुष्याचं खरं गमक आहे.

या सूत्रावरच त्यांची वाटचाल सुरू आहे. आज एखाद्या पीडिताचे अश्रू पुसताना, एखाद्या गरजूला मदत करताना त्यांना जो आनंद मिळतो, तोच त्यांच्या जीवनाचा खरा पुरस्कार आहे.

चेतन बंडेवार यांच्या सामाजिक जडणघडणीमागे एक अत्यंत शांत, पण मूलभूत ताकद उभी आहे, ती म्हणजे त्यांची आई, आरती बंडेवार. त्या अत्यंत साध्या शब्दांत, पण खोल आशयाने सांगतात, कुठले कुठले अमुक काम करू नकोस, असं मी कधीही चेतनला सांगितलं नाही. या एका वाक्यातून त्यांची मातृदृष्टी, जीवनदृष्टी आणि मूल्यांची शिदोरी स्पष्टपणे समोर येते. आई म्हणून त्यांनी कधीही भीतीची कुंपणं चेतनभोवती उभी केली नाहीत.

समाजकार्य, सेवा, मदत, या सगळ्यांत कष्ट, संघर्ष, कधी कधी अपयशही येईल, याची त्यांना जाणीव होती. पण मुलाला मोठं करायचं असेल, तर त्याच्या वाटा रुंद ठेवाव्या लागतात.. हा त्यांचा ठाम विश्वास होता. म्हणूनच त्यांनी कधीही हे करू नको, तिथे जाऊ नको, हे धोक्याचं आहे असं बजावलं नाही. उलट, जिथे माणुसकीची गरज आहे, तिथे तू नक्की जा असं नकळतपणे त्याच्या मनात रुजवलं.

आरती बंडेवार यांच्यासाठी शिक्षण, व्यवसाय किंवा समाजकार्य हे वेगवेगळे कप्पे नव्हते; ते जीवनाचे एकसंध रूप होते. आपल्या घरात सुख असेल, समाधान असेल; पण ते इतरांपर्यंत पोहोचत नसेल, तर त्या सुखाला अर्थ उरत नाही, असं त्या नेहमी सांगत.

चेतनला मिळालेलं स्वातंत्र्य हे बेफिकिरीचं नव्हतं, तर जबाबदारीची जाणीव देणारं होतं. प्रत्येक निर्णयामागे समाजाचा विचार असावा, ही शिकवण त्यांनी शब्दांपेक्षा कृतीतून दिली.

मुलगा समाजासाठी काहीतरी करतो आहे, हे पाहताना त्यांच्या डोळ्यांत कधी अभिमान दाटतो, तर कधी आई म्हणून काळजीही येते. पण त्या काळजीवर नेहमीच विश्वासाचं पांघरूण असतं. तो कुणाचे अश्रू पुसतो आहे, कुणाच्या आयुष्यात उजेड देतो आहे, एवढं मला माहीत आहे; मग मी त्याला कसं थांबवू? हा त्यांचा साधा, पण फार मोठा प्रश्न आहे.

आज चेतन बंडेवार यांची वाटचाल राज्याच्या, देशाच्या सीमा ओलांडून साता समुद्रांपलीकडे पोहोचताना दिसते. त्या प्रत्येक टप्प्यामागे आईने दिलेलं न बोललेलं बळ आहे, भीतीऐवजी विश्वास देणारं, अडवणुकीऐवजी आशीर्वाद देणारं. आरती बंडेवार यांची ही मातृभूमिका म्हणजे केवळ एका मुलाची घडण नाही, तर माणुसकीला दिशा देणारी संस्कारांची परंपरा आहे.

चेतन यांच्या पत्नी प्रिया बंडेवार यांचाही चेतन यांच्या कार्यामध्ये सिंहाचा वाटा आहे.

तामसाच्या मातीपासून सुरू झालेली चेतन बंडेवार यांची सामाजिक वाटचाल आज साता समुद्रांपलीकडे पोहोचलेली आहे. उद्योग, शिक्षण आणि सामाजिकता यांचा सुंदर समन्वय साधत त्यांनी उभं केलेलं काम केवळ एका व्यक्तीची कथा नाही, तर आधुनिक भारतातील मूल्याधिष्ठित विकासाचं प्रेरणादायी उदाहरण आहे. समाजासाठी जगण्याची ही धग, हीच त्यांची खरी ओळख आणि खरा वारसा आहे.

---

चेतन बंडेवार संपर्क क्रमांक
8898299999

## वाचक लिहितात

### मतदार हा नेहमी 'राजा'च असतो!

महानगरपालिकेचा प्रचार थंडावला. कालपर्यंत उमेदवार आणि कार्यकर्ते यांची परिसरात असलेली लगबग पूर्णपणे थांबली. लोकशाहीच्या या उत्सवात केंद्रबिंदू असतो तो 'मतदार'. त्यामुळेच मतदाराला 'मतदारराजा' असेही संबोधले जाते.

मतदारराजाचे मताचे दान आपल्या झोळीत पडावे, यासाठी निवडणुकीत उभे राहिलेले समस्त उमेदवार प्रचाराच्या दरम्यान नेहमीप्रमाणे मतदारांच्या हाता पाया पडताना दिसले. निवडून आल्यावर मात्र हेच सूत्र व्यस्त होते. निवडून आलेला लोकप्रतिनिधी राजा होतो, तर मतदार याचक. आपल्या आणि आपल्या परिसराच्या समस्या लोकप्रतिनिधींच्या पुढे मांडण्यासाठी या याचकाला लोकप्रतिनिधींच्या अपॉइंटमेंट घ्याव्या लागतात, दिवसदिवसभर त्यांच्या कार्यालयात तिष्ठत बसावे लागते, आपल्या समस्या त्यांच्या सचिवांसमोर मांडाव्या लागतात, त्यानंतरही भेट झालीच तरी काम होईलच याची शाश्वती नसते. पुन्हा पाठपुरावा करण्यासाठी दिवस खर्ची घालावे लागतात.

आपण जनतेचे राजे नाहीत तर केवळ त्यांचे प्रतिनिधी आहोत, त्यांच्या कृपेमुळेच आपले अस्तित्व आहे, त्यांनी शासनदरबारी भरलेल्या करातूनच आपल्याला वेतन मिळणार आहे, त्यांनीच आपल्याला खुर्चीवर बसवले असून मनात आणले तर ते आपल्याला खुर्चीवरून खालीही खेचू शकतात याची जाण लोकप्रतिनिधींनीं सदैव ठेवावी. लोकशाही शासन प्रणालीत केवळ निवडणुकीच्या आधीच नव्हे,तर मतदार हा कायमस्वरूपी राजाच असतो हे भावी लोकप्रतिनिधींनी आतापासूनच मनावर बिंबवावे !

■ सौ. मोक्षदा घाणेकर
काळाचौकी, मुंबई.

### मतदान ही देशसेवाच!

मतदान हा लोकशाहीतील सर्वात मोठा उत्सव. या उत्सवात सर्व जाती-धर्माची माणसे एकत्र येऊन आपल्या शहराचे, राज्याचे आणि देशाचे भवितव्य कोणी ठरवावे याचा निर्णय घेतात; मात्र या उत्सवात सहभागी होण्याविषयीची उदासीनताही आज तितक्याच प्रमाणात आहे. 'कुणाचीही सत्ता येवो, आपल्या दिनक्रमात काहीही फरक पडणार नाही, मग मतदान करायचे कशाला ?' ही नकारात्मकता लोकशाहीला कमकुवत करते. हीच बुद्धिजीवी मंडळी इतरवेळी मात्र 'लोकप्रतिनिधींनी असा निर्णय घ्यायला हवा होता,शहरात तसे घडायला हवे होते' यावर तासनतास चर्चा करतात. ज्यांना मतदान करण्यासाठी अर्धा तास वेळ काढता येत नाही त्यांना खरे तर समाजाच्या परिस्थितीवर भाष्य करण्याचाही नैतिक अधिकार नाही. सैन्यात भरती होऊन देशप्रेम दाखवण्याची संधी सर्वांनाच मिळत नाही; मात्र आपल्या जिल्ह्याची, राज्याची आणि देशाची धुरा सांभाळण्यासाठी योग्य उमेदवार निवडून देण्याची संधी तर सर्वच प्रौढांना मिळते, त्या संधीचा लाभ घेणे ही देशसेवाच आहे ही भावना लोकांमध्ये रुजायला हवी.

■ ज्योती रावराणे, कांजूरमार्ग, मुंबई.

## !! पतंग !!

पौष सूर्याच्या कोवळ्या उन्हात
नात्यांचा गोडवा दरवळला,
तिळगुळ घ्या अन् गोड बोला
प्रेमाचा संदेश मनी रुजला.

निळ्याशार त्या अथांग नभी
रंगांची जणू उधळण झाली
रंगीत पतंग बघूनी अवघी
सृष्टी आज आनंदली.

वाऱ्याची ती मंद झुळूक
पतंगाला दिशा दावी,
तोल सावरण्या जीवनाचा
दोऱ्याची ती साथ हवी.

मजबूत असावा विश्वासाचा दोरा
नाती कधी न तुटावी
यशाची ती उंच शिखरे
ध्येयाने आपण गाठावी.

काटा-काटीच्या या जगात
खिलाडू वृत्ती जपून ठेवू
माणुसकीच्या निळ्या नभांत
सुखाचे रंग भरत राहू...

श्रीमती संज्योती चंदन (राजुस्कर)
अकोला.

# मटणापेक्षाही या डाळी शरीरासाठी फायदेशीर



देशातील प्रत्येकाच्या आहारात डाळी असतातच असतात. काही डाळी तर मटणापेक्षाही अत्यंत फायदेशीर असतात. या डाळींमध्ये शरीराला प्रथिने, फायबर, जीवनसत्त्वे आणि खनिजे पुरवतात, ज्यामुळे आरोग्य मजबूत राहते. मात्र, सर्व डाळींचा शरीरावर समान परिणाम होत नाही.

प्रत्येक डाळीचा स्वभाव आणि परिणाम वेगळा असतो. म्हणूनच डाळी नेहमी आपल्या शरीराच्या प्रकारानुसार आणि पचनशक्ती लक्षात घेऊन निवडाव्यात. चला जाणून घेऊया की कोणती डाळ कोणते फायदे देते आणि ती कशी खावी?

**मूगाची डाळ**

या यादीत सर्वात आधी मूगाची डाळ येते. डॉक्टरांच्या मते मूगाची डाळ सर्वात हलकी आणि पचायला सोपी मानली जाते. ती पोटावर ताण देत नाही, गॅस आणि ॲसिडिटी कमी करण्यास मदत करते, तसेच वजन नियंत्रणात ठेवू इच्छिणाऱ्यांसाठीही उपयुक्त आहे. कमजोर पचनशक्ती असलेले लोक, लहान मुले, वृद्ध आणि आजारातून बरे होत असलेले लोक ही डाळ सहजपणे खाऊ शकतात. ती आरोग्यासाठी फायदेशीर आहे.

**मसूर डाळ**

मसूर डाळीत भरपूर प्रमाणात लोह (आयर्न) असते, त्यामुळे ती ॲनिमिया असलेल्या लोकांसाठी फायदेशीर ठरते. ती ऊर्जा वाढवते आणि थकवा कमी करते. मात्र, काही लोकांमध्ये ती थोडा गॅस निर्माण करू शकते, त्यामुळे ज्यांची पचनशक्ती कमजोर आहे त्यांनी प्रमाणातच सेवन करावे.

**चणाडाळ**

चणाडाळ प्रथिने आणि फायबरचा उत्कृष्ट स्रोत आहे. ती हळूहळू पचते, त्यामुळे रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित ठेवण्यास मदत करते आणि अचानक साखर वाढू देत नाही. मात्र, ती थोडी जड असल्याने ज्यांची पचनशक्ती कमजोर आहे त्यांनी ती कमी प्रमाणात आणि नीट शिजवून खावी.

**तूर डाळ**

तूर डाळ शक्तिदायक आणि संतुलित मानली जाते. ती ना फार जड असते ना फार हलकी, त्यामुळे दैनंदिन वापरासाठी उत्तम पर्याय आहे. ती शरीराला पोषण, ताकद आणि स्थिर ऊर्जा प्रदान करते.

**उडीद डाळ**

उडीद डाळ हाडे आणि स्नायूंना बळकट करण्यासाठी उपयुक्त मानली जाते. ती कॅल्शियम आणि इतर पोषक घटकांनी समृद्ध असते. मात्र, ती गॅस, ॲसिडिटी आणि मूळव्याध वाढवू शकते, त्यामुळे अशा समस्या असलेल्या लोकांनी तिचे सेवन सावधपणे करावे.

डाळ निवडताना आपल्या पचनसंस्थेचा, गरजांचा आणि शरीराच्या प्रकाराचा विचार करा. योग्य प्रमाणात आणि योग्य पद्धतीने तयार केलेली डाळ शरीराला उत्तम पोषण देते.

■ ■ ■

## अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



### अविरोध विजयी?

लाखात एकादाच असतो
असा भाग्यवान
ज्याला जनता अविरोध
करते मतदान ...

अहो आश्चर्यम! कधी नव्हे एवढे
अविरोध घोषित झाले उमेदवार
सत्तास्पर्धेची तिव्रता पाहता
जनतेला हे हजम होईना यार ..


घसरलेली नितिमत्ता पाहता
हे रयतेला रहस्यमय भासते
साम काम दंड भेदच्या
कुटनितीची किमया असू शकते ..

कायद्याच्या चौकटीत बसवून
केली कोणतीही अवैध कृती
पुरावेच नसतील तर
कायदा देई त्यास स्विकृती . .

ज्यांची लोकप्रियता अफाट
ते येतील प्रचंड मताने निवडून
जनतेच्या मताचा हक्क तर
घेतल्या जात नाही ना हिरावून ?

# निरामय

## गर्भपातानंतरची काळजी



आरोग्यचर्चा

गर्भपात दु:खदायी असतो. या आघातानंतर महिलांना शारीरिक आणि मानसिक आधाराची गरज असते. शरीरातही बरेच बदल घडलेले असतात. पुढच्या बदलांना तोंड द्यायचं असतं. अशाप्रकारे प्रसंग बाका असला तरी महिलांनी आरोग्याकडे विशेष लक्ष द्यायला हवं. आरोग्य हेच त्यांचं पहिलं प्राधान्य असायला हवं. मूल गेल्यामुळे मोठा धक्का बसलेला असतो. अस्वस्थता जाणवत असते. याचा परिणाम त्यांच्या मानसिक आणि शारीरिक आरोग्यावर होत असतो. दरम्यान शरीरही पुर्ववत होण्याच्या प्रयत्नात असतं. पोषक आहार, सकारात्मकता आणि मानसिक कणखरता यांच्या बळावर महिला पुन्हा उभ्या राहू शकतात. या पार्श्वभूमीवर गर्भपातानंतर नेमकी कोणती काळजी घ्यायला हवी याविषयी...

* या काळात महिलांना पुरेसा आराम गरजेचा असतो.
* गर्भपातानंतर रक्तस्राव सुरू होतो. त्यामुळे शारीरिक स्वच्छतेकडे लक्ष द्यावं लागतं. या दरम्यान इतर कोणत्याही पर्यायापेक्षा सॅनिटरी नॅपकिन्सचा वापर करायला हवा. योनीमार्गाच्या जंतूसंसर्गाचा धोका असतो. तो लक्षात घेता दिवसातून एक ते दोन वेळा आंघोळ करा.
* किमान दोन आठवडे शारीरिक संबंध टाळा. सावरण्यासाठी शरीराला आणि मनाला पुरेसा वेळ द्या.
* भरपूर पाणी प्या. शरीरातला ओलावा टिकवून ठेवण्याचा प्रयत्न करा. फळांचे रस, हर्बल टी, नारळ पाणी यांचं सेवन करता येईल.
* नियमित तपासणी करून घ्या. जंतूसंसर्ग, योनीमार्गाशी संबंधित विकार तसंच पुन्हा गर्भधारणा होण्याशी संबंधित अडचणींची शक्यता दूर करण्यासाठी तसंच वेळेत उपचार घेण्यासाठी वैद्यकीय चाचणी गरजेची आहे.
* गर्भपातानंतर होणारा रक्तस्राव मासिक पाळीसारखाच असतो. तो बराच काळपर्यंत सुरू राहू शकतो. या काळात ओटीपोट्या खालच्या भागात वेदना जाणवू शकतात. त्यामुळे या काळात सकस आणि आरोग्यदायी आहार घ्यायला हवा.
* रक्तस्रावामुळे रक्तातल्या लोहाचं प्रमाण कमी होतं. त्यामुळे लोहयुक्त पदार्थांचं सेवन करा. गर्भासह कॅल्शियमही कमी झालेलं असतं. ही झीज भरून काढण्यासाठी दुग्धजन्य पदार्थांचा समावेश आहारात करायला हवा.
* पुन्हा गर्भधारणेचा विचार करत असाल तर फॉलिस अ‍ॅसिडचं सेवन करा. जवस, हिरव्या पालेभाज्या, ब्रोकोली, भेंडी यातून फॉलिक अ‍ॅसिड मिळतं. आहारात क जीवनसत्त्वाचा समावेश करा.
* साखरयुक्त पदार्थ, जंक फूडचं सेवन टाळा. जंक फूडमुळे शरीराला फायबरचे लाभ योग्य प्रकारे मिळू शकत नाहीत. चरबीयुक्त तसंच साखरयुक्त पदार्थांमुळे शरीराची झालेली झीज भरून निघण्यात अडचणी येतात.

## हिवाळ्यात पक्षाघाताच्या रुग्णसंख्येत वाढ

हिवाळ्यात मेंदू पक्षाघाताच्या (पॅरालिसिस) रुग्णसंख्येत २५ ते ३० टक्क्यांची वाढ झाली आहे. यामागे पर्यावरणीय घटक, शारीरिक हालचालींमध्ये झालेली घट, शरीरातील पाण्याची कमतरता व त्याने रक्तातील वाढणारा घट्टपणा, हंगामी होणारा संसर्ग, मधुमेह आणि उच्च रक्तदाब यासारख्या दीर्घकालीन आजारांचे नियंत्रण बिघडणे ही यामागील कारणे सांगितली जात आहेत.

तापमान घटल्याने रक्तवाहिन्या आकुंचन पावतात. त्याने मेंदूकडे जाणारा रक्तप्रवाह कमी होऊन 'इस्केमिक स्ट्रोक' (मेंदूला होणारा रक्तप्रवाहात अडथळा आल्याने होणारा पक्षाघात) होतो. तसेच पाणी कमी प्यायल्याने रक्तामधील पातळपणा कमी होतो. दुसरा प्रकार म्हणजे हेमोरेजिक स्ट्रोक. हा मेंदूतील रक्तवाहिनी फुटल्यामुळे होतो आणि यामागे बहुतेकवेळा अनियंत्रित उच्च रक्तदाब कारणीभूत असतो. त्यासाठी नियमित औषधे घ्यायला हवीत.



**ही आहेत लक्षणे...**

* अचानक चेहऱ्याचा एक भाग वाकडा होणे
* हात किंवा पायातली ताकद कमी होणे, बधिरपणा येणे
* बोलण्यात अडचण येणे, अस्पष्ट किंवा दुहेरी दिसणे (दोन व्यक्ती/वस्तू दिसणे)
* चक्कर येणे, तीव्र डोकेदुखी किंवा तोल जाणे


व्याधी विकार
**डॉ. महेश दळे**

**दरवर्षी १५ लाख जणांना पक्षाघात**

'इंडियन स्ट्रोक असोसिएशन'नुसार भारतात दरवर्षी सुमारे १५ लाख नवीन पक्षाघाताच्या रुग्णांची नोंद होत आहे. त्यामुळे 'पक्षाघात' हे मृत्यू आणि दीर्घकालीन अपंगत्वाचे प्रमुख कारण ठरत आहे. दिवाळीपासून फेब्रुवारीपर्यंत पक्षाघाताचे रुग्ण ३० टक्यांनी वाढतात. त्याला हिवाळ्यात रक्तवाहिन्या आकुंचन पावणे हे कारण सांगितले जाते; परंतु त्याला काही शास्त्रीय आधार नाही. याला प्रामुख्याने कारणीभूत बैठी जीवनशैली व धूम्रपान हे ठरत आहे. पक्षाघाताची लक्षणे सुरू झाल्यानंतर पहिल्या चार ते साडेचार तासांचा 'गोल्डन अवर' (सुवर्ण तास) अत्यंत महत्त्वाचा असतो. या काळात योग्यवेळी उपचार मिळाल्यास मेंदूच्या रक्तवाहिनीतील अडकलेली रक्ताची गाठ औषधे देऊन विरघळवता येते.

## महिलांमध्ये अधिक चिडचिडेपणा

मायग्रेन ही एक प्रकारची तीव्र डोकेदुखी आहे. त्यामुळे मळमळ, चिडचिडेपणा होऊ शकतो. हा आजार पुरुषांपेक्षा स्त्रियांमध्ये अधिक सामान्य आहे. तज्ज्ञांच्या मते याचे एक प्रमुख कारण म्हणजे महिलांच्या शरीरात होणारे हार्मोनल बदल. विशेषतः इस्ट्रोजेन नावाचा संप्रेरक मायग्रेनवर परिणाम करतो. हा संप्रेरक वर आणि खाली जातो, तेव्हा मायग्रेनचा हल्ला होऊ शकतो. म्हणूनच, बऱ्याच स्त्रियांना मासिक पाळी, पौगांडावस्थेत, गर्भधारणेनंतर किंवा रजोनिवृत्तीच्या आसपास मायग्रेन जास्त असते. योग्य माहिती, योग्य उपचार आणि निरोगी सवयींमुळे मायग्रेनला नियंत्रित केले जाऊ शकते.



आरोग्यमंत्र
**डॉ. अजिंक्य बोऱ्हाडे**

महिलांमध्ये मासिक पाळीसुरू होण्यापूर्वी अनेक बदल दिसून येतात. त्यामुळे पोटदुखीच्या समस्या आणि शरीरामध्ये थकवा जाणवतो. मासिक पाळीच्या आधी, इस्ट्रोजेन अचानक कमी होते. त्यामुळे मायग्रेन होऊ शकते. पौगांडावस्थेत, गर्भधारणेनंतर आणि रजोनिवृत्तीदरम्यान हार्मोन्स बदलतात, म्हणून मायग्रेन वाढू शकते. गर्भधारणेच्या शेवटच्या महिन्यांत इस्ट्रोजेन स्थिर राहतेतेव्हा बऱ्याच स्त्रियांना मायग्रेन कमी होते. याव्यतिरिक्त, स्त्रियांमध्ये मायग्रेनचे हल्ले दीर्घकाळ टिकू शकतात. मळमळ, प्रकाश आणि ध्वनीमुळे अधिक अस्वस्थता येऊ शकते.

मायग्रेन वारंवार येत असेल तर डॉक्टर दररोज औषधे किंवा नवीन थेरपी सुचवू शकतात. चांगल्या दैनंदिन सवयींमध्ये वेळेवर झोपणे, हलका व्यायाम करणे, योग्य आहार घेणे आणि पाणी पिणे, तणाव कमी ठेवणे हे उपाय आहेत.

## आता इन्शुलीनच्या इंजेक्शनपासून सुटका

भारतात दहा कोटींहून अधिक लोक मधुमेहग्रस्त आहेत. त्यापैकी अंदाजे दहा लाख लोक टाइप १ मधुमेहाने ग्रस्त आहेत. त्यांना सर्वात जास्त इन्सुलिनची आवश्यकता असते. टाइप १ आणि टाइप २ मधुमेहाच्या रुग्णांच्या उपचारांसाठी इन्सुलिनची आवश्यकता असते.

टाइप १ मधुमेह असलेल्या लोकांना इन्सुलिनची तातडीने आवश्यकता असते. मधुमेहाच्या रुग्णांच्या शरीरात इंजेक्शनद्वारे इन्सुलिन इंजेक्शन दिले जाते. ते त्यांच्या साखरेची पातळी नियंत्रित करते किंवा संतुलित करते. या इंजेक्शन प्रक्रियेत बदल करून, प्रसिद्ध औषध कंपनी 'सिप्ला'ने 'इनहेल्ड इन्सुलिन लाँच' करण्याची घोषणा केली आहे. त्यामुळे श्वासोच्छवासाद्वारे रुग्णाच्या शरीरात इन्सुलिन पोहोचवता येते.

नवसंशोधन
**डॉ. गोवर्धन हुसळे**

'सिप्ला' या प्रसिद्ध औषध कंपनीने भारतातील मधुमेहाच्या रुग्णांसाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. पूर्वी इंजेक्शनद्वारे दिल्या जाणाऱ्या इन्सुलिन उपचारांच्या प्रक्रियेत लक्षणीय बदल करून, त्यांनी भारतीय बाजारात 'अफ्रेझा' नावाच्या जलद काम करणारी इनहेल्ड इन्सुलिन पावडर लाँच करण्याची घोषणा केली आहे. यामुळे इंजेक्शन आणि सुया टाळणाऱ्या किंवा घाबरणाऱ्या रुग्णांना आराम मिळेल. आता मधुमेह असलेले लोक इन्सुलिन पावडर सहजपणे श्वासाने घेऊ शकतात आणि श्वासाद्वारे त्यांच्या शरीरात पोहोचवू शकतात. कंपनीने सांगितले, की त्यांना गेल्या वर्षी सरकारी औषधनिर्माण संस्था 'सेंट्रल ड्रग्स स्टँडर्ड कंट्रोल ऑर्गनायझेशन'कडून जलद काम करणाऱ्या इनहेल्ड इन्सुलिन पावडरसाठी मान्यता मिळाली आहे. त्यामुळे ते ही नवीन प्रकारची इन्सुलिन पावडर त्वरित भारतीय बाजारात आणत आहेत. कंपनीच्या मते, हे इन्सुलिन मधुमेहाच्या रुग्णांमध्ये जलद प्रभावीपणा दर्शवते.



**इनहेल्ड इन्सुलिन कसे वापरले जाते?**

आफ्रेझा, एक जलद इनहेल्ड इन्सुलिन पावडर असते. ती एका लहान इनहेलरद्वारे एका विशेष सिंगल-यूज कार्ट्रिजमधून वापरता येते. इन्सुलिनच्या प्रमाणनुसार डोस थेट शरीरात इनहेल करू शकता.

## त्रिदोषांबद्दल जाणून घ्या

आयुर्वेदात वात, कफ आणि पित्त अशा तीन प्रवृत्ती किंवा दोषांवर भर देण्यात आला आहे. प्रत्येक दोषाचे गुणधर्म वेगळे असतात. त्यांना नियंत्रणात ठेवण्यासाठी डॉक्टर विशिष्ट प्रकारचा आहार घेण्याचा सल्ला देतात. या प्रवृत्तींच्या गुणधर्मांबाबत जाणून घेऊ या.




आयुर्वेद आणि विकार

**वात प्रवृत्ती**

या प्रवृत्तीचे लोक उपजतच कल्पक असतात. ते चंचल असतात. त्यांना संवाद साधायला आवडतो. वैचारिक क्षमता उत्तम असते. वजन लवकर वाढत नाही. त्यांची त्वचा कोरडी असते. त्यांना उष्ण, आर्द्र हवामान भावतं. त्यांची झोप, भूक आणि ऊर्जेची पातळी सातत्याने बदलत राहते. वातप्रवृत्तीच्या लोकांसाठी उष्ण, द्रव पदार्थ योग्य असतात. सौम्य प्रमाणात आलं आणि दालचिनी घातलेली सूप्स तसंच करी त्यांना चालते. त्यांनी अंजीर, अ‍ॅव्हॅकॅडो, केळी, दुग्धजन्य पदार्थ, बदाम यांचा समावेश आहारात करायला हवा. नियमित योगासनं आणि चालण्याने त्यांचं आरोग्य उत्तम राहतं.

**पित्त प्रवृत्ती**

या प्रवृत्तीचे लोक मध्यम बांध्याचे असतात. त्यांना वजनाचं संतुलन साधता येतं. यांची भूक जास्त असते. उत्साह दांडगा असतो. थंड किंवा उष्ण पदार्थ त्यांना चालतात. सॅलड, पुदिना, कोथिंबीर आणि हळद घालून तळलेले पदार्थ, ब्रोकोली, मटारसारख्या भाज्या त्यांना चालतात. पण वांगी, कांदा आणि मिरच्या टाळाव्या. केळी, कलिंगड, द्राक्ष ही फळं खाता येतात. या लोकांनी मध्यम स्वरूपाचा व्यायाम करावा.

**कफ प्रवृत्ती**

या प्रवृत्तीच्या लोकांची स्मरणशक्ती चांगली असते. वजन लवकर वाढतं. त्वचा नितळ आणि केस मुलायम असतात. कोबी, पालक, बटाटे त्यांना खाता येतात. त्यांना नारळ, सफरचंद, डाळिंब चालतं. धावणं, पोहणं, दोरीच्या उड्या असा व्यायाम त्यांच्यासाठी योग्य ठरतो.

## जेवणानंतर झोपताय?

दुपारचं जेवण झाल्यानंतर अनेकांना अचानक झोप येते, डोळे जड होतात आणि कामावर लक्ष लागत नाही. अनेक लोक हे सामान्य समजून दुर्लक्ष करतात.जेवणानंतर सतत झोप येणं, हे नेहमी नॉर्मल असतं असं नाही. ही समस्या शरीरात सुरू असलेल्या काही गंभीर आरोग्य बदलांचे संकेत देऊ शकते. जेवल्यानंतर शरीर अन्नाच्या पचनावर लक्ष केंद्रित करते. या दरम्यान पचनसंस्थेच्या अवयवांकडे रक्ताचा प्रवाह वाढतो आणि मेंदूकडे जाणारा रक्तप्रवाह थोडा कमी होतो. यामुळे शरीरात जडपणा, सुस्ती किंवा झोप जाणवू शकते. वैज्ञानिक भाषेत याला पोस्ट लंच डिप म्हणतात. ही एक नैसर्गिक प्रक्रिया असून काही कारणांमुळे याचा प्रभाव वाढू शकतो. दुपारी जेवणानंतर झोप येत असेल, तर हे इन्सुलिन रेझिस्टन्स सुरुवातीचं लक्षण असू शकते. अशावेळी शरीर साखरेचे ऊर्जेत रुपांतर नीट करू शकत नाही. त्यामुळे जेवणानंतर ब्लडशुगर वेगाने वाढते आणि नियंत्रित करण्यासाठी शरीर जास्त इन्सुलिन सोडते. हीच क्रिया काही वेळाने थकव्याचे कारण बनवते. दीर्घकाळ इन्सूलिन रेझिस्टन्स राहिल्यास भविष्यात डायबेटीस, हृदयविकार आणि काही प्रकरणांमध्ये कॅन्सरचा धोका वाढू शकतो. तसेच अनेकवेळा उपाशी पोटी केलेली शुगर टेस्ट नॉर्मल असूनही ही समस्या वाढू शकते. यालाच सायलेंट मेटाबॉलिक प्रॉब्लेम म्हणतात.



जाणून घ्या
**डॉ. कुंदन गायकवाड**

**कोणते उपाय**

* दुपारी हलका आणि संतुलित आहार घ्यावा. *आहारात फायबर आणि प्रोटनयुक्त पदार्थांचा समावेश करा आणि गोड पदार्थ खाणे टाळा.* जेवणानंतर चालणे आरोग्यदायी मानले जाते. * रोज व्यायाम, वजन नियंत्रण आणि पुरेशी झोप घेतल्यास ही समस्या कमी होऊ शकते.

## हिवाळ्यात जाणवतात अधिक वेदना

सध्या हिवाळ्याचा ऋतू सुरू आहे. वाढत्या थंडीचा त्रास अनेक रुग्णांना होतो. विशेषतः कर्करोगाच्या रुग्णांना या वाढत्या थंडीचा अधिक त्रास जाणवतो. रुग्णांनी केलेल्या तक्रारींनुसार हिवाळ्यात त्यांच्या वेदना तीव्र किंवा अधिक स्थिर होतात. केमोथेरपी किंवा रेडिएशन घेत असलेल्या लोकांमध्ये अनेकदा नसा संवेदनशील होतात, म्हणून तापमानात घट झाल्यास त्यांना अस्वस्थता किंवा वेदना जाणवू शकतात.

व्याधी विचार
**डॉ. सतीश सोनवणे**

हिवाळ्यातील थंड तापमान, स्नायूंचा कडकपणा, सूर्यप्रकाशाची कमतरता आणि रक्तप्रवाह मंदावल्यामुळे हिवाळ्यात कर्करोगाशी संबंधित वेदना अधिक तीव्र होतात. तापमान घसरल्यावर शरीरातील रक्तप्रवाह, स्नायूंची लवचिकता आणि नसांमधील संवेदनशीलतेत बदल होतात. त्याचा थेट परिणाम वेदनांवर होतो. थंड हवामानामुळे रक्तवाहिन्या आकुंचन पावतात. यामुळे स्नायू आणि ऊतींना रक्तपुरवठा कमी होतो. त्यामुळे वेदना होतात. थंड तापमानामुळे स्नायू कडक होतात आणि वेदना वाढतात आणि कधीकधी गतिहीनतादेखील वाढू शकते. हिवाळ्यात केमोथेरपीमुळे न्यूरोपॅथीची समस्या जाणवते.

न्यूरोपॅथी म्हणजे मज्जातंतूंच्या नुकसानामुळे शरीराच्या एका किंवा अधिक भागांमध्ये होणारी वेदना, सुन्नपणा (बधीरपणा), मुंग्या येणे किंवा अशक्तपणा ही एक स्थिती आहे. ती मधुमेहासारख्या अनेक कारणांमुळे होऊ शकते आणि पायांमध्ये जास्त आढळते. काही कर्करोगाच्या रुग्णांना पायांमध्ये जळजळ, मुंग्या येणे आणि बधीरपणा जाणवू शकतो. ते चिंताजनक असू शकते आणि त्यांना वेळीच लक्ष देण्याची गरज भासू शकते. हिवाळ्यातील संसर्गांमुळे शरीरावर ताण येऊ शकतो, जळजळ वाढते आणि कर्करोगाच्या वेदना आणखी तीव्र होतात. कर्करोगाच्या रुग्णांनी स्वतःच्या आरोग्याची काळजी घेतली पाहिजे आणि उपचार करणाऱ्या तज्ज्ञांनी दिलेल्या सूचनांचे पालन केले पाहिजे.



**काय काळजी घ्यावी?**

सांधे कडक होणे आणि सांध्यामधील वेदना टाळण्यासाठी कर्करोगाच्या रुग्णांनी त्यांचे शरीर उबदार ठेवणे आणि संपूर्ण शरीर झाकणारे कपडे घालणे गरजेचे आहे. स्नायुंचा कडकपणा दूर करण्यासाठी उबदार कॉम्प्रेस किंवा हीटिंग पॅडचा पर्याय निवडा. घरच्या घरी स्ट्रेचिंग करा किंवा चालण्याचा व्यायाम करा, जे रक्ताभिसरण सुधारण्यास फायदेशीर ठरेल. थकवा आणि वेदना व्यवस्थापित करण्यासाठी पुरेशी झोप घ्या. तीव्र सांधेदुखी आणि स्नायुंचा कडकपणा दूर करण्यास तज्ज्ञांचा सल्ला घ्या. थंडीच्या महिन्यांत कर्करोगाच्या रुग्णांनी सतर्क रहा आणि स्वतःची विशेष काळजी घ्या.

## मधुमेहावर मात करण्यासाठी

रात्रप-ळी आणि अनारोग्यदायी जीवनशैलीमुळे टाईप २ मधुमेहाचा धोका वाढत असल्याचं संशोधनातून समोर आलं आहे. हा विकार होण्याची शक्यता असणाऱ्यांनी आणि मधुमेहींनी आहारविषयक कोणती काळजी घ्यायला हवी याविषयी...



* मधुमेहींनी कमी कर्बोदकयुक्त आहार घ्यायला हवा. अतिरिक्त कर्बोदकांमुळे रक्तातल्या साखरेची पातळी वाढते.
* अल्कोहोलमुळे वजन, रक्तातल्या ट्रायग्लिसराईड्सचं प्रमाण आणि रक्तदाब वाढत असल्याने मद्यपानाचं प्रमाण कमी असावं.
* प्रथिनं, तंतूमय पदार्थ, जीवनसत्त्वं आणि खनिजांनी समृद्ध पोषक आहार घ्यावा.

घ्या काळजी

* प्रक्रिया केलेले, हवाबंद पदार्थ टाळावे. नियमित व्यायामावर भर द्यावा.
* ड जीवनसत्त्वामुळे रक्तातल्या साखरेच्या पातळीवर परिणाम होत असल्याचं काही संशोधनांमधून समोर आलं आहे. त्यामुळे हे जीवनसत्त्व मुबलक प्रमाणात मिळत असल्याची खात्री करून घ्या.

नवसंशोधन

### अ‍ॅप करणार अ‍ॅनिमियाचं निदान!



रक्तचाचणीशिवाय अ‍ॅनिमियाचं निदान करणारं स्मार्टफोन अ‍ॅप विकसित करण्यात आलं आहे. या अ‍ॅपमुळे स्मार्टफोनवरून काढण्यात आलेल्या नखांच्या फोटोवरून रक्तातल्या हिमोग्लोबिनचं नेमकं प्रमाण कळू शकतं. आपल्या देशात अ‍ॅनिमियाचं प्रमाण बरंच जास्त आहे. त्यातही महिलांना मोठ्या प्रमाणात या समस्येला सामोरं जावं लागतं. गरोदर, धावपटू, खेळाडू तसंच जुनाट अ‍ॅनिमिया असणाऱ्यांना हे अ‍ॅप उपयुक्त ठरू शकतं. हे अ‍ॅप २०१९ मध्ये सर्वसामान्यांसाठी उपलब्ध होणार आहे.

डोळ्यांचं आरोग्य

### धोका मोतीबिंदूचा...



विशिष्ट वयानंतर मोतीबिंदू जडतो. मोतीबिंदू विकसित होण्यासाठी विशिष्ट वेळ जावा लागतो. साठीनंतर त्याचे परिणाम जाणवू लागतात. वय हे मोतीबिंदूचं सर्वात महत्त्वाचं कारण आहे. मधुमेहींना हा विकार होण्याचा धोका जास्त असतो. मायोपिया असणाऱ्यांनाही मोतीबिंदू होऊ शकतो. यासोबतच इतरही काही कारणांमुळे मोतीबिंदू जडू शकतो. वयावर आपलं नियंत्रण नसलं तरी वेळेआधी होणाऱ्या मोतीबिंदूवर मात्र नियंत्रण मिळवता येतं.

दंतारोग्य

### मुलांच्या दातांच्या बळकटीसाठी...



जंकफूड, साखरयुक्त पदार्थ यामुळे मुलांच्या तोंडाचं आरोग्य धोक्यात येऊ शकतं. दातांच्या आरोग्यासाठी मुलांना सकस आहार द्यायला हवा. त्यांच्या आहारात प्रथिनं, खनिजं, फायबर आणि जीवनसत्त्वयुक्त घटक असणं गरजेचं असतं. आहारात कर्बोदकांचा समावेश असायला हवा.

आजीबाईचा बटवा

### आरोग्यदायी कंदमुळं



कांदा, मुळा, सुरण, रताळी, गाजर ही सर्व कंदमुळं आहेत. हे सर्व पदार्थ चविष्ट आणि आरोग्यदायी आहेत. कांद्यात अ‍ॅंटिऑक्सिडंट्स, क जीवनसत्त्व आणि फायबर असतं. बीटमध्ये मँगनीज असतं. शरीरात हिमोग्लोबिनची कमतरता असेल तर बीट खायला हवं. आल्यामुळे मळमळ, उलट्यांचा त्रास कमी होतो. बटाट्यात क जीवनसत्त्व मुबलक प्रमाणात आढळतं. रताळंही पोषक घटकांनी समृद्ध असतं. त्यामुळे या कंद मुळांचा आहारात समावेश करायला हवा.

# 'पाडू' मशीनवर आक्षेप ही त्यांच्या पराभवाची तयारी

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १४ :



महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी ईव्हीएमला जोडण्यात येणाऱ्या पाडू मशीनवरील आरोप फेटाळून लावले. ठाकरे बंधूंना आपल्या पराभवाची चाहूल लागली असून, त्यातून ते अशी विधाने करत आहेत, असे ते म्हणालेत. मतदानाच्या आदल्या दिवशी मतदारांच्या भेटीगाठी घेणे हे नियमांनुसारच आहे, असेही ते यावेळी म्हणाले.

निवडणूक आयोगाने मतदानाच्या आदल्या दिवशी मतदारांना भेटण्याची मुभा दिली आहे. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी यावर जोरदार आक्षेप घेतला आहे. पत्रकारांनी याविषयी मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना छेडले असता ते म्हणाले, केंद्र किंवा राज्य निवडणूक आयोगाच्या नियमानुसार कोणतेही पेपर किंवा जाहिरात न करता कोणत्याही हँडबिल किंवा पोस्टर न वाटता आपल्याला मतदारांच्या घरी जाता येते. आम्हालाही चार घरी भेटी देता येतात. पण याचा अर्थ असा नाही की, आम्ही कार्यकर्त्यांकडे जायचे नाही, कुणाला भेटायचे नाही. समाजातील प्रतिष्ठित लोकांना भेटावेच लागते. शेवटी मतदान कुणाला करायचे ते लोक करतील. पण भेट घेणे हे नियमातच आहे.

राज ठाकरे यांनी निवडणूक आयोगाने पाडू मशीनच्या मुद्यावर राजकीय पक्षांना विश्वासात घेतले नसल्याचाही आरोप केला आहे. बावनकुळे यावर म्हणाले, काँग्रेस, उद्धव ठाकरे यांना आपला पराभव होणार आहे असे वाटते तेव्हा ते अशी विधाने करतात.

ही पराभवापूर्वीची तयारी आहे. ज्या ठिकाणी काँग्रेसचा विजय होतो, त्या ठिकाणी ते मशीनला दोष देत नाहीत. ज्या ठिकाणी काँग्रेस किंवा महाविकास आघाडीचा पराभव होतो त्याठिकाणी आतापासून निवडणुकीतील पराभवाची तयारी राज व उद्धव ठाकरे करत आहेत.
मुंबई ही विकासाला मतदान करणार आहे हे त्यांना ठावूक आहे. देवेंद्र फडणवीस म्हणजे विकास व विकास म्हणजे देवेंद्र फडणवीस हा विश्वास महाराष्ट्र व मुंबईच्या जनतेपर्यंत पोहोचला आहे. ठाकरे बंधूंना आता आपला पराभव दिसत आहे. त्यामुळे त्यांनी तशी तयारी सुरू केली आहे.
उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी भाजपवर १९९९ साली पार्टी फंडासाठी सिंचन प्रकल्पातून काही कोटी रुपये घेतल्याचा आरोप केला आहे. बावनकुळे यांनी या आरोपावर तीव्र संताप व्यक्त केला. ते म्हणाले, १९९९ ते २०२६ हा फार मोठा काळ आहे. १९९९ मध्ये ज्या वेळी अजित पवारांकडे फाईल आली, तेव्हाच त्यांनी एखादा आरोप केला असता तर त्याला अर्थ असता.

आता एवढ्या उशिरा हे सांगून किंवा एक फाईल माझ्याकडे आली होती, त्यावर असे काही लिहिले होते, असे सांगण्यात कोणतेही तथ्य नाही. जनता त्यावर विश्वास ठेवत नाही. अजित पवार जे बोलत आहेत, त्यांच्याकडून आम्हाला अशी अपेक्षा नाही, असे बावनकुळे म्हणाले.

# मनपाची संपूर्ण यंत्रणा मतदानासाठी सज्ज

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १४ :

राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार नागपूर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूक- २०२६ करिता गुरुवारी १५ जानेवारी रोजी सकाळी ७.३० वाजेपासून सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत ३००४ मतदान केंद्रात मतदान केले जाणार आहे. शहरातील मतदारांनी आपला हक्क व कर्तव्याचे वहन करावे,आणि अधिकाधिक संख्येत मतदान करावे असे आवाहन मनपा आयुक्त तथा निवडणूक अधिकारी डॉ. अभिजीत चौधरी यांनी केले आहे.





नागपूर शहरातील २४,८३,११२ मतदार आपला मताधिकाराचा वापर करणार असून यामध्ये १२,२६,६९० पुरुष आणि १२,५६,११६ महिलांचा समावेश आहे. मतदारांना ३८ बहु सदस्यीय प्रभाग पद्धतीमधून १५१ सदस्यांची निवड करायची आहे. मतदारांना प्रभाग क्रमांक १ ते ३७ करिता ४ मत द्यायचे आहे, तर प्रभाग क्रमांक ३८ करिता ३ मत द्यायचे आहे.

यावेळी ९९३ उमेदवार रिंगणात आहे. मतदानासाठी सर्व तयारी झाली असून, ५०४ बसेस मधून मतदान साहित्य आणि पथकाला मतदान केंद्रात पोहचविण्यात आले आहे. मतमोजणी १६ जानेवारी रोजी सकाळी १० वाजेपासून महानगरपालिकेच्या झोन स्तरावर १० ठिकाणी होणार आहे.

नागपूर महानगरपालिका तर्फे ९६४ इमारती मध्ये ३००४ मतदान केंद्र उभारण्यात आले आहे. यासाठी ३५७९ केंद्राध्यक्ष आणि १०,७३७ मतदान अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे. प्रत्येक मतदान केंद्रात १ पोलीस/ होम गार्ड राहणार असून, २४४ झोनल अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

सर्व मतदान केंद्रात किमान अत्यावश्यक सोई सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. नागपूर पोलीस प्रमाणे संवेदनशील मतदान केंद्राची संख्या ३२१ असून, इथे आवश्यक पोलीस बंदोबस्त लावण्यात आला आहे. मतदारांसाठी दहाही झोन मध्ये प्रत्येकी एक पिंक मतदान केंद्र आणि एक आदर्श मतदान केंद्रची व्यवस्था करण्यात आली आहे.

राज्य निवडणूक आयोगाने मुख्य निवडणूक निरीक्षक म्हणून डॉ. माधवी खोडे-चवरे यांची नियुक्ती करण्यात आली असून, निवडणूक निरीक्षक म्हणून संतोष थिटे त्यांना सहकार्य करणार आहेत. मनपा आयुक्त तथा निवडणूक अधिकारी डॉ. अभिजीत चौधरी, अतिरिक्त आयुक्त श्रीमती वसुमना पंत आणि श्रीमती वैष्णवी बी सुद्धा मतदान आणि मतमोजणी प्रक्रीयावर नजर ठेवून आहे.

मतदारांना आपले मतदान केंद्र शोधणे सुलभ व्हावे, यासाठी नागपूर महानगरपालिकेच्या माहिती व तंत्रज्ञान विभागाने नवे डीजीटल प्लॅटफॉर्म मतदारांना उपलब्ध करून दिले आहे. मतदारांना मनपाच्या संकेतस्थळा सोबतच मनपाचे चॅटबॉट, एआय मित्र व माय नागपूर ॲपवर मतदान केंद्र तात्काळ शोधता येणार आहे. या डीजीटल प्लॉटफॉर्मवर मनपाने आपले मतदान केंद्र ही सुविधा उपलब्ध करून दिली आहे. यात मतदारांना मतदार ओळखपत्रावर असलेले नाव किंवा मतदार ओळखपत्र क्रमांक (ईपीआयसी) नुसार शोधता येणार आहे. मतदाराला मराठी किंवा इंग्रजी भाषेचा नाव शोधण्यासाठी उपयोग करता येणार आहे. मतदारांनी ईपीक क्रमांकानुसार मतदान केंद्र शोधल्यास अधिक अचूक व तात्काळ माहिती मिळू शकेल.

निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या स्तरावर १० मतमोजणी केंद्राची स्थापना करण्यात आली असून, १६ जानेवारी रोजी सकाळी १० वाजता मतमोजणीला सुरुवात होणार आहे. साधारणतः प्रत्येक निवडणूक निर्णय अधिकारी कडे २० टेबल ईवीएम साठी तसेच पोस्टल बेलेट साठी ४ टेबलची व्यवस्था करण्यात आली आहे.

# राफेल विमानांची नागपुरात बांधणी

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि.१४ :

भारतीय हवाई दलासाठी ११४ राफेल एफ४ लढाऊ विमाने खरेदी करण्याबाबत भारत आणि फ्रान्स यांच्यातील प्रमुख बाबींवर एकमत झाले आहे. या कराराची औपचारिक प्रक्रिया २०२६ अखेर किंवा २०२७च्या सुरुवातीस पूर्ण होण्याची शक्यता आहे, अशी माहिती सूत्रांनी दिली.

सुमारे ३.२५ लाख कोटी रुपयांच्या या प्रकल्पाअंतर्गत १८ विमाने थेट फ्लाय-अवे स्थितीत खरेदी केली जातील, तर उर्वरित विमाने भारतात तयार केली जाणार आहेत. टप्प्याटप्प्याने ६० टक्क्यांपर्यंत स्वदेशी घटकांचा वापर करण्यात येणार असून ही प्रक्रिया सी-२९५ वाहतूक विमान प्रकल्पाच्या धर्तीवर असेल. सध्या तेजस विमानात ६२ टक्के स्वदेशी घटक आहेत.



या करारामध्ये भविष्यात राफेलचे एफ ५ आवृत्तीत अद्ययावत करण्याचा पर्यायही असेल. सध्या भारतीय हवाई दलात सेवेत असलेली सर्व राफेल विमाने एफ४ मानकांनुसार अपग्रेड केली जाणार आहेत. सध्या वापरात असलेली विमाने एफ३-आर प्लस प्रकारातील असून, त्यामध्ये भारतासाठी खास १३ सुधारणा करण्यात आल्या आहेत.

राफेल एफ ४ मानकांमध्ये उपग्रह व इन्ट्रा-फ्लाइट संपर्क प्रणाली, सॉफ्टवेअर रेडिओ, प्रगत संप्रेषण सर्व्हर यांचा समावेश असून, नेटवर्क-केंद्रित युद्ध क्षमता वाढवण्यावर भर देण्यात आला आहे. हे मानक भविष्यातील फ्युचर कॉम्बॅट एअर सिस्टीम साठीही मार्ग मोकळा करते.

करारावर २०२७ च्या सुरुवातीस स्वाक्षरी झाल्यास, पहिल्या १८ विमानांचा पुरवठा २०३० पासून सुरू होईल. ॲक्सेप्टन्स ऑफ नेसेसिटी मंजूर झाल्यानंतर अंतिम खर्च व तपशील निश्चित केले जातील.

■ *नागपूर : मकरसंक्रांत म्हटले की पतंगबाजीला उधाण येते. या सणाला नागपूर शहरातील प्रत्येक गच्ची आणि स्लॅबवर पतंग उडविणाऱ्यांची मोठीच झुंबड दिसून येते. बालगोपालापासून आबालवृद्धही याचा आनंद घेतात. आज बुधवारी शहराच्या कानाकोपऱ्यात घरोघरी प्रत्येक जण पतंग उडविण्याचा आनंद घेताना दिसून आले.*




## लोकजागर

# भटके श्वान आणि मांजरांना मायेचा आसरा देणारी संस्था आर्ट



पुणे शहरातील भटकी श्वान आणि मांजरांना आता मायेचा आसरा मिळू लागला आहे. विशिष्ट प्रजातीचे नव्हे तर भटक्या प्राण्यांना नागरिकांची पसंती मिळत आहे. शहरातील भटकी श्वान आणि मांजरांना आता मायेचा आसरा मिळू लागला आहे. विशिष्ट प्रजातीचे नव्हे तर भटक्या प्राण्यांना नागरिकांची पसंती मिळत आहे.

हे साध्य होत आहे ते ॲनिमल ॲडोप्शन अँड रेस्क्यू टीम (आर्ट) यांच्या पुढाकाराने. यासाठी आर्ट या संस्थेतर्फे दरवर्षी भटक्या प्राण्यांना दत्तक घेण्यासाठी शिबिराचे आयोजन करण्यात येते. तसेच हजारो भटक्या प्राण्यांचे बचाव कार्य देखील करण्यात आले आहे.

आर्टच्या संस्थापक भारती तांबे यांनी सांगितले की, शहरातील भटक्या प्राण्यांची संख्या ही वाढत आहे. अनेकांना पाळीव प्राण्यांची आवड असते. त्यामुळे नागरिकांनी केवळ विशिष्ट प्रजातींच्या पाळीव प्राण्यांना प्राधान्य न देता भटकी श्वान किंवा मांजरांना पाळीव प्राणी म्हणून दत्तक घ्यावे, ज्यामुळे ही संख्या देखील नियंत्रित राहण्यास मदत होईल, असा हेतू डोळ्यासमोर ठेवून २००८ मध्ये आर्टच्या माध्यमातून भटकी प्राण्यांच्या दत्तक शिबिरांना सुरवात झाली.

तांबे म्हणाल्या, सुरवातीच्या वर्षात केवळ ५ ते ८ श्वानांना दत्तक घेण्याचे प्रमाण होते. दरवर्षी अशा शिबिरांचे आयोजन करण्यात येते. त्यात उपस्थितांना भटक्या श्वानांना किंवा मांजरींना दत्तक घेण्याचे, नसबंदीची माहिती देण्याबरोबर भटक्या प्राण्यांना सुरक्षित हाताळणे, जखमी झालेल्या प्राण्याला कशी मदत करावी आणि मानव-प्राण्यांमधील संघर्ष कसा कमी करता येईल याबाबत मार्गदर्शन केले जाते.

या उपक्रमाला १५ वर्ष होत असून जवळपास दोन हजार भटक्या प्राण्यांना नागरिकांद्वारे दत्तक घेतले आहे. हा एक सकारात्मक बदल असून नक्कीच भविष्यात याचे प्रमाण अधिक वाढेल अशी अपेक्षा आहे.

संस्थेच्यावतीने केवळ भटकी श्वान व माजरांसाठी दत्तक शिबिरेच नाही तर, जखमी श्वानांना किंवा मांजरींना उपचारही दिले जातात. त्यासाठी संस्थेच्या स्वयंसेवकांद्वारे शहरातील विविध परिसरात अपघातात, आजारी असलेल्या प्राण्यांना वाचविणे, त्यांच्यावर औषधोपचार करणे तसेच त्यांना निवारा प्रदान करण्याचे काम केले जाते. याकरिता प्राण्यांसाठी असलेल्या विविध पुनर्वसन केंद्रांमध्ये त्यांना सोडले जाते. तसेच याची नोंद देखील ठेवली जाते. ज्यामुळे प्राण्यांच्या पुनर्वसनासाठी याचा फायदा होत असल्याचे तांबे यांनी नमूद केले. माणसांप्रमाणेच भटक्या श्वानांना आणि प्राण्यांना सुरक्षित निवारा व अन्न मिळाल्यास तेदेखील निरोगी राहू शकतात. भटक्या प्राण्यांची रस्त्यावरील संख्या कमी करणे.,भटक्या प्राण्यांच्या प्रजनन वाढीवर नियंत्रण आणणे.त्यांची नियमित वैद्यकीय तपासणी करणे हि संस्थेची उद्दिष्ट आहेत. ■ ■

# भंगारातून करोडोची कमाई अनेकांना जॉब



तारिक अहमद घनी यांनी भंगारातून एखादा व्यक्ती श्रीमंत कसा होऊ शकतो हे जगाला दाखवले आहे. त्यांची वार्षिक उलाढाल आता कोट्यवधी रुपयांपर्यंत पोहोचली आहे.कोणताही व्यवसाय हा छोटा नसतो, फक्त तो करण्यासाठी जिद्द आणि चिकाटी लागते.

जम्मू काश्मिरचे नाव ऐकले तर पर्यटन व्यवसाय आपल्या डोळ्यासमोर येतो. मात्र दक्षिण काश्मीरमधील कुलगाम जिल्ह्यातील गदीहामा गावातील तारिक अहमद घनी यांनी भंगारातून एखादा व्यक्ती श्रीमंत कसा होऊ शकतो हे जगाला दाखवले आहे. तारिक हे आज संपूर्ण परिसरासाठी प्रेरणास्थान बनले आहेत. कठोर परिश्रम आणि सकारात्मक विचाराने कोणतेही अशक्य काम शक्य होऊ शकते हे त्यांनी सिद्ध केले आहे. त्यांची वार्षिक उलाढाल कोट्यवधी रुपयांपर्यंत पोहोचली आहे.

तारिक अहमद घनी यांचा हा व्यवसाय पर्यावरण संरक्षणाचेही काम करत आहे. तारिक हे प्लास्टिक आणि इतर कचरा गोळा करतात, त्याच्यावर प्रक्रिया करतात आणि तो पुन्हा वापरतात. तारिक यांच्या या व्यवसायामुळे परिसरात वाढणारा कचरा आणि प्रदूषणाच्या समस्येवर तोडगा निघाला आहे.

ते अप्रत्यक्षरित्या पर्यावरण संरक्षणात महत्त्वाचे योगदान देत आहेत. भंगाराच्या व्यवसायामुळे तारिक अहमद केवळ स्वतः श्रीमंत होत नाहीत तर परिसरातील तरुणांसाठी त्यांनी रोजगार उपलब्ध करुन दिला आहे. प्लास्टिकवर प्रक्रिया करण्याच्या त्यांच्या युनिटमध्ये ५० पेक्षा जास्त तरुण काम करत आहेत. यातील अनेकजण पदवीधर आणि पदव्युत्तर शिक्षण घेतलेले युवक आहेत. यामुळे तरुणांना रोजगार मिळाला असून पर्यावरणाचेही संरक्षण होत आहे.

तारिक अहमद यांनी हे यश कोणत्याही औपचारिक शिक्षणाशिवायही केवळ योग्य विचारसरणी, कठोर परिश्रम आणि समर्पणाच्या जोरावर मिळवले आहे. त्यांनी केवळ एक व्यवसाय उभारला नाही तर तो सतत पुढे नेत लोकांनाही त्यात सहभागी करुन घेतले आहे. त्यामुळे त्यांनाही यश मिळत गेले.

तारिक अहमद गनी यांचे नाव काश्मीरमधील निवडक उद्योजकांमध्ये घेतले जाते ज्यांनी सामाजिक आणि पर्यावरणीय बदलाचा मार्ग दाखवला आहे. ते इतरांसाठी प्रेरणा बनले आहेत. कचऱ्यातही सुवर्ण संधी लपलेल्या असू शकतात असे त्यांच्या प्रवासातून समोर आले आहे.

तारिक प्रमाणेच जर केवळ शिक्षणाना नंतर चाकोरीबद्ध करिअरची वाट न चोखाळता स्वतचा वेगळा असा एखादा व्यवसाय सुरु केला तर नक्कीच या व्याव्स्यात यशश्वी होता येत आणी स्वताच विश्व अक्षरश शून्यातून उभा करता येत हे नक्की. ■ ■ ■

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

# जन्मदात्यानेच घेतला चिमुकलीचा जीव

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि.१४ :

दारूच्या आहारी गेलेल्या पित्याने पोटच्या मुलीचा चाकूने भोसकून खून केल्याची संतापजनक घटना नागपूर शहरात घडली. दारुड्या पतीला कंटाळलेली पत्नी विभक्त झाल्यानंतर केवळ तिला विरोध करायचा म्हणून जन्मदात्या पित्याने ८ वर्षीय चिमुकलीचा निर्घृण खून केला.
शेखर कृष्णराव शेंदरे (४५) असे बापाचे नाव आहे. मद्याच्या आहारी गेलेला शेखर गुन्हेगारी प्रवृत्तीचा आहे. तो दिवस रात्र दारूच्या नशेत मारहाण आणि वाद घालत असल्याने शेखरची पत्नी शुभांगी शेखरपासून फारकत घेत वेगळी राहते. या पती पत्नीची मुलगी धनश्रीचा ताबा शेखरने घेतला होता. शेखरची आई कुसुमबाई कृष्णराव शेंदरे धनश्रीचा सांभाळ करत होत्या.

दारूचे व्यसन आणि रोजच्या भांडणाला कंटाळून पत्नी शुभांगी वेगळी रहात असल्यापासून शेखर हा आई कुसुमबाई आणि लहान भाऊ उमेश (४५) सह मुलीला घेऊन वाठोडा भागातल्या सरोदे नगरात भाड्याच्या खोलीत रहात होता. मजुरी करून उदरनिर्वाह करणाऱ्या कुसुमबाई देखील धुणीभांडी करून नात धनश्रीला सांभाळत होत्या.

शेखरची पत्नी शुभांगी गेल्या अनेक महिन्यांपासून मुलगी धनश्रीचा ताबा मागत होती. मात्र शेखर आपली मुलगी धनश्रीचा ताबा सोडायला तयार नव्हता. बुधवारी सकाळी शाळेत जाण्यापूर्वी धनश्रीने आजीला पाणी मागितले. त्याच वेळी दारूच्या नशेत असलेल्या शेखरने मुलीला आधी मारहाण केली. काही कळायच्या आत त्याने जवळच पडलेला भाजी कापण्याचा सूरा उचलून तो धनश्रीच्या छातीत खुपसला.

बापाने केलेले एकच वार वर्मी लागल्याने रक्तबंबाळ झालेल्या धनश्रीचे हृदय पंक्चर झाले. तोवर शेजारी आणि आजीने तडक धनश्रीला उचलून वाठोडा पोलीस ठाणे गाठले. पोलिसांनी घटनेचे गांभीर्य ओळखून तडत तिला मेडिकलमध्ये हलवले. मात्र तिथे पोचताच डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले.

वाठोडा पोलिसांच्या दुसऱ्या पथकाने दारूच्या नशेत बेशुद्ध पडलेल्या शेखर शेंदरेला अटक करत चाकू जप्त केला. शेखर विरोधात यापूर्वीही गंभीर गुन्हा दाखल आहे. मद्याच्या आहारी गेलेल्या शेखरने मुलीचा जीव घेईन पण तिला तुझ्याकडे सोपवणार नाही, अशी धमकी दिली होती.

# राष्ट्रीय बॉक्सिंग स्पर्धेत अल्फिया पठाणला सुवर्ण



■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि.१४ :

नागपूर विभागासाठी अभिमानास्पद ठरणारी कामगिरी करत मध्य रेल्वेच्या नागपूर विभागात तिकीट तपासनीस (टीटीई) म्हणून कार्यरत असलेल्या अल्फिया पठाण हिने ९ व्या एलिट सीनियर राष्ट्रीय पुरुष व महिला बॉक्सिंग अजिंक्यपद स्पर्धेत सुवर्णपदक पटकावले.

उत्तर प्रदेशातील नोएडा येथे नुकत्याच पार पडलेल्या या प्रतिष्ठित स्पर्धेत भारतीय रेल्वेचे प्रतिनिधित्व करताना अल्फियाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले.

# भाजप उमेदवाराच्या प्रचारासाठी रोख रकमेचे वाटप?

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि.१४ :

नागपूर महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आदर्श आचारसंहितेच्या उल्लंघनाचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे.
भाजपच्या उमेदवार प्रगती अजय पाटील यांच्या प्रचारासाठी काही कार्यकर्त्यांनी मतदारांना रोख रक्कम व साहित्य वाटप केल्याचा आरोप कॉंग्रेस कार्यकर्त्यांनी केला असून, या प्रकरणी तक्रार दाखल करण्यात आली आहे. संबंधित प्रकरणी पोलीस ठाण्यातही नोंद करण्यात आल्याने राजकीय वातावरण तापले आहे.



कॉंग्रेस कार्यकर्ते पोलीस ठाण्यात

भाजपचे कार्यकर्ते विवेक सिंग, मानस माळी आणि अन्य दोन जण ग्रोथीखेडेन परिसरातील आझाद नगर, केरस्टन नगर आणि ब्रेमलियुरा भागात प्रचार पत्रकांसह रोख रक्कम वाटप करत होते. हा प्रकार दुपारी साडेबाराच्या सुमारास घडल्याचे सांगण्यात येते. माहिती मिळताच कॉंग्रेसचे कार्यकर्ते घटनास्थळी दाखल झाले असता, संबंधित आरोपी दुचाकीवरून पळून जाण्याचा प्रयत्न करीत असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

तक्रारीनुसार, विवेक सिंग याने राजेश ग्रेफुल्ले यांच्यासह काही नागरिकांना प्रत्येकी एक हजार रुपयांची रक्कम व प्रचार पत्रके दिली. मतदारांना थेट आर्थिक प्रलोभन देऊन मतदान प्रक्रियेवर प्रभाव टाकण्याचा हा प्रयत्न असून, तो निवडणूक आयोगाच्या आदर्श आचारसंहितेचा स्पष्ट भंग असल्याचा आरोप करण्यात आला आहे. या घटनेमुळे परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

या प्रकरणी कॉंग्रेस कार्यकर्त्यांनी संबंधित पोलीस ठाण्यात जाऊन तक्रार दाखल केली असून, निवडणूक निर्णय अधिकारी व निवडणूक प्रशासनाकडेही लेखी निवेदन देण्यात आले आहे. संबंधित भागातील सीसीटीव्ही फुटेज तातडीने तपासण्यात यावे, प्रत्यक्षदर्शींचे जबाब नोंदवावेत तसेच दोषी आढळणाऱ्यांविरोधात निवडणूक आयोगाच्या नियमांनुसार कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

दरम्यान, निवडणूक प्रशासनाने या तक्रारीची दखल घेत प्राथमिक चौकशी सुरू केल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. सीसीटीव्ही फुटेज, तक्रारदारांचे जबाब व इतर पुराव्यांच्या आधारे पुढील कारवाई ठरविण्यात येणार आहे. निवडणूक काळात पैशांचे वाटप, प्रलोभने किंवा दबावतंत्र वापरण्याच्या प्रकारांवर प्रशासनाची कडक नजर असून, आचारसंहितेचा भंग करणाऱ्यांवर कारवाई केली जाईल, असा इशाराही प्रशासनाकडून देण्यात आला आहे.